JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

समाचार
SAMACHAR

Volume - 72 | Issue- 201 | Marathi Daily | Wednesday 17/4/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3

सोनेतारण कर्ज
फक्त १० मिनीटात रू.३५०००/-*
मुदत ठेव १३ महिने १०% | १० ग्रॅमसाठी | दामदुप्पट ९० महिने
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, स्वामी विवेकानंद चौक, शनि मंदिरासमोर, अहमदनगर. फोन-०२४१ २३४५९८३
E mail : kailasnagari@ gmail.com

अग्रलेख: न्यायालयापुढे शीर्षासन पान २

लोकशाहीच्या उत्सवात मतदानाचे कर्तव्य बजावणार पान ५

निसर्गसंपन्न मामाच्या मळ्यात 'आयकॉन'च्या विद्यार्थ्यांची धमाल पान ६

उठाठेव
– विवेक मेहेत्रे

टी. व्ही. वर 'क्रिकेटसामना, मालिका की निवडणुकांच्या रणधुमाळीच्या बातम्या' या वरून आमच्या घरातही रोज 'मतदान' घ्यावं लागतं!

'जय श्रीराम'च्या घोषणेने शहर दुमदुमले
नगरमध्ये रामनवमी उत्सवाचा जल्लोष

श्रीरामभक्त हनुमान सत्संग मंडळातर्फे नेता सुभाष चौक येथील राममंदिरात श्रीराम नवमीनिमित्त करण्यात आलेली आकर्षक फुलांची सजावट आणि नव्याने उभारण्यात आलेली देखणी कमान.

समाचार/नगर-दि.१७

नगर शहर व परिसरात आज श्रीरामनवमी उत्सवाची सर्वत्र धूम पहायला मिळाली. नगर शहरात भक्तीमय वातावरण बनले होते. जय श्रीरामच्या घोषणांनी नगर शहर व उपनगर दुमदुमून गेले होते.

शहरातील नेता सुभाष चौकातील पुरातन श्रीराम मंदिरात श्रीरामभक्त हनुमान सत्संग मंडळाने आकर्षक फुलांची सजावट केली होती. मंदिराची नव्याने उभारण्यात आलेली कमान भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. सकाळपासूनच या ठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर नवीपेठ येथील लेले वाड्यातील श्रीराम मंदिर, विवेकानंद चौकातील रामदासी वाडा येथील श्रीराम मंदिर, तेलीखुंट येथील श्रीराम मंदिर, दाळमंडई येथील श्रीराम मंदिर, सर्जेपुरा येथील दक्षिणमुखी मारुती मंदिरातील श्रीराम मंदिर, कल्याण रस्त्यावरील थोरले श्रीराम मंदिर, **(पान ३ वर)**



नगरमधील रिक्षाचालक दत्तात्रय महादेव शेलार (रा. भूषणनगर, केडगाव) यांनी स्केच पेनने साकारलेले प्रभू श्रीरामाचे चित्र.

निवडक
उत्तमराव जानकरांनी घेतली पवारांची भेट

पुणे, दि.१७– सोलापुरातील माढा लोकसभा मतदारसंघात भाजपाचे वजनदार नेते धैर्यशील मोहिते पाटील यांना आपल्या पक्षात घेऊन उमेदवारी दिल्यानंतर आता शरद पवार यांनी ही जागा जिंकण्यासाठी डावपेच सुरू केले आहेत. या मतदारसंघातील दुसरे वजनदार नेते उत्तम जानकर यांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी शरद पवार यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. दरम्यान, मोहिते पाटील आणि उत्तम जानकर हे पारंपरिक विरोधक आहेत. पण, आताच्या लोकसभा निवडणुकीनिमित्ताने एकत्र येण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर उत्तम जानकर आणि धैर्यशील मोहिते पाटील यांनी पुण्यात शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर उत्तम जानकर यांनी अंतिम निर्णय १९ तारखेला होईल, असे म्हणत माढ्यातील सस्पेन्स कायम ठेवला आहे. शरद पवार यांची भेट झाल्यानंतर उत्तम जानकर यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी उत्तम जानकर म्हणाले, माढा लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने शरद पवार यांची बैठक झाली. शरद पवारांची इच्छा होती की, मी आणि मोहिते यांनी एकत्र यावे. याबाबत येत्या ३ दिवसात दुसरी बैठक होईल. १९ तारखेला माळशिरस आमदारकीबद्दल चर्चा होईल.

भाजपाचे संकल्पपत्र महिला, युवक, शेतकऱ्यांना समर्पित- मंत्री विखे

समाचार/नगर-दि.१७

भाजपाचे संकल्प पत्र देशातील सर्वसामान्य नागरिक, महिला, युवक आणि शेतकरी यांना समर्पित झाले असून, संकल्प पत्रातून जाहीर करण्यात आलेल्या प्रत्येक योजनेला पंतप्रधान नरेंद्र मोदींची गॅरंटी आहे. सबका साथ सबका विकास हा भाव भाजपाच्या संकल्प पत्राचा आत्मा असल्याचा विश्वास पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. भाजपाच्या संकल्प पत्राच्या अनुषंगाने लोकसभा मतदारसंघाचा वचननामा लवकरच प्रकाशित करण्यात येणार आहे. जिल्ह्यात रोजगार निर्मिती, तिर्थक्षेत्र पर्यटन तसेच प्रलंबित पाणी योजनांच्या सोडवणुकीसाठी प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, बाबुशेठ टायरवाले, नितीन दिनकर, धनंजय जाधव, निखील वारे उपस्थित होते.भाजपाच्या संकल्प पत्रासाठी देशातील लोकांच्या काय अपेक्षा आहेत, यासाठी सुचना पाठविण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देवून, संपुर्ण देशातून १६ लाख सुचना यासाठी प्राप्त झाल्या. नगर जिल्ह्यातूनही १० हजार सुचना संकल्प पत्रासाठी पाठविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

विखे म्हणाले की, भारताला प्रक्रिया उद्योगाचे हब बनवून प्रक्रिया उद्योग ग्रामीण अर्थकारणाचे ग्रोथ इंजिन ठरेल असे उदिष्ट या संकल्प पत्रातून ठेवण्यात आले आहे. नारीशक्ती वंदना अधिनियम पंतप्रधान नरेंद्र मादी यांच्या सरकारची **(पान ३ वर)**

२ लाख ६८ हजाराचा मुद्देमाल हस्तगत; ४ गुन्ह्यांची कबुली
रांजणगाव मशीद दरोड्यातील ६ आरोपींच्या एलसीबीने मुसक्या आवळल्या

समाचार/नगर-दि.१७

पारनेर तालुक्यातील रांजणगाव मशिद दरोडा प्रकरणातील सहा आरोपींच्या स्थानिक गुन्हे शाखेने मुसक्या आवळल्या. या कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने २ लाख ६८ हजार ५०० रूपयांचा ऐवज हस्तगत केला आहे. पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सोपान गोरे, समाधान भाटेवाल, अंमलदार भाऊसाहेब काळे, बबन मखरे, रवींद्र कर्डिले, दत्तात्रय हिंगडे, बापुसाहेब फोलाणे, ज्ञानेश्वर शिंदे, अतुल लोटके, गणेश भिंगारदे, देवेंद्र शेलार, विजय ठोंबरे, संदीप चव्हाण, भीमराज खर्से, संदीप दरंदले, फुरकान शेख, मच्छिंद्र बर्डे, रविंद्र घुगांसे, रोहित येमुल, आकाश काळे, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, सागर ससाणे, जालिंदर माने, किशोर शिरसाठ, विशाल तनपुरे, उमाकांत गावडे, संभाजी कोतकर, भाग्यश्री भिटे, ज्योती शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. वसंत गणपत जवक (वय ३६, रा. रांजणगाव मशिद, ता. पारनेर) हे कुटूंबियासह घरात झोपलेले असताना ६ जणांनी घरात प्रवेश केला. लाकडी दांडके व कोयत्याने मारहाण करुन घरातील २ लाख ४८ हजार ५०० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर घरगुती साहित्य चोरी करुन नेले होते. ही घटना दि. १५ रोजी घडली होती. याप्रकरणी **(पान ३ वर)**

नीलेश लंके यांची नगर शहरात प्रचारफेरी

समाचार/नगर-दि.१७

माजी आमदार नीलेश लंके यांची दिल्लीगेट येथून प्रचारफेरी काढण्यात आली. याप्रसंगी संभाजी कदम, अभिषेक कळमकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण काळे, भरत खकाळ, विक्रम राठोड, भगवान फुलसौंदर, अशोक बाबर, संजय शेंडगे, नलिनी गायकवाड, आशा निंबाळकर, संजय झिंजे, गणेश कवडे, बाळासाहेब बोराटे, दत्ता जाधव, सुरेश तिवारी, गिरीष जाधव उपस्थित होते.

अभिषेक कळमकर म्हणाले, नगरमध्ये अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. निलेश लंके यांनी पारनेरमध्ये जी विकास कामे केली, तशीच विकासकामे करणारा खासदार झाला पाहिजे, असे सांगितले.कदम म्हणाले, नीलेश लंके यांच्या विजयासाठी शिवसेना प्रयत्नशील आहे. नगरकरांनीही लंके यांना साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.कदम म्हणाले, नीलेश लंके यांच्या विजयासाठी शिवसेना प्रयत्नशील आहे. नगरकरांनीह लंके यांना साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. किरण काळे म्हणाले, लोकप्रतिनिधी कसा असावा, हे निलेश लंके यांनी दाखवून दिले आहे. लंके यांच्यासाठी महाविकास आघाडीचे सर्वच पक्ष सरसावले आहेत. कल्याण रोड, बालिकाश्रम रोड, तोफखाना, चितळे रोड, पटवर्धन चौक, गंजबाजार, दाळमंडई, माणिकचौक मार्गे माळीवाडा येथील ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात सत्राचा समारोप झाला.

आगरकर मळ्यात दोन महिन्यांपासून होता वावर
अखेर 'तो' बिबट्या पिंजऱ्यात

समाचार/नगर-दि.१७

आगरकर मळा, रेल्वे स्टेशन परिसरातील गायके मळा या भागामध्ये दोन महिन्यापासून बिबट्याचा वावर होता. या बिबट्याने अनेक कुत्रे आणि डुकरांचा फडशा पाडला होता. त्यामुळे नागरिक भयग्रस्त झाले होते. दरम्यान, या भागातील नागरिकांनी वनविभागाकडे पिंजरा लावण्याची मागणी केली होती. एक महिन्यापासून हा पिंजरा गायके मळा परिसरामध्ये लावण्यात आला होता. आज पहाटे हा बिबट्या या लावलेल्या पिंजऱ्यामध्ये आपोआप जेरबंद झाला. ही बाब सकाळी निदर्शनास आल्यानंतर परिसरातील नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

या भागातील अक्षय गायके यांनी सांगितले की, या परिसरात दोन महिन्यापासून बिबट्याचा वावर असल्यामुळे नागरिक भयभीत झाले होते. त्यामुळे वनविभागाकडे याबाबत तक्रारही केली होती. वनविभागाने तातडीने पिंजरा लावला. हा बिबट्या जेरबंद होण्यात यश आले.

मोटारसायकल चोरी करणारा जेरबंद

समाचार/नगर-दि.१७

नगर–मनमाड रस्त्यावरील गजराजनगर फाटा येथून मोटारसायकल चोरी करणाऱ्याला एमआयडीसी पोलिसांनी पकडले.

सहायक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ नंदकिशोर सांगळे, राजू सुद्रीक, पोना विष्णू भागवत, पोकॉ किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, राहुल गुंडू यांच्या पथकाने ही कारवाई केली. सपोनि चौधरी यांना माहिती मिळाली होती की सदरचा गुन्हा हा मधुकर ससे याने केला आहे. चौधरी यांच्या सुचनेवरून एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने त्यास ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव मधुकर बाबासाहेब ससे (वय ४०, रा. झापवाडी, ता. नेवासा, जि. नगर) असे सांगितले. त्याच्याकडून चोरीस गेलेली मोटारसायकल हस्तगत करण्यात आली आहे. पुढील तपास एमआयडीसी पोलिस करीत आहे.

निवडणुकीच्या हंगामात डाळी कडाडल्या

समाचार/नगर-दि.१७

देशात सध्या लोकसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरु आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या काळात कोणत्याही वस्तू महाग होऊ नयेत आणि त्याचा रोष सरकारवर येऊ नये म्हणून सत्ताधारी प्रयत्न करत आहेत. महागाई वाढू नये म्हणून सरकारकडून विविध धोरणे आखली जात आहेत. परंतु, सध्या डाळींच्या किंमतीत वाढ झाली आहे. यामुळे सरकार मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे.

महागाई वाढू नये, असा सरकारचा प्रयत्न आहे. सध्या बाजारात डाळींच्या किंमती शंभर रुपयांच्या आसपास आहेत. त्याच वेळी लोकसभेच्या निवडणुका सुरू आहेत. अशातच किंमतीत वाढ होत असल्याने सर्वसामान्यांना मोठा फटका बसत आहे. त्यामुळे महागाई नियंत्रित ठेवण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. सरकार आता डाळींच्या व्यापाऱ्यांवर निर्बंध आणण्याची तयारी करत आहे.

दरम्यान, सरकार डाळी व्यापाऱ्यांना डाळींचा साठा जाहीर करणे बंधनकारक करण्याची शक्यता आहे. मोठे व्यापारी आणि किरकोळ विक्रेते या दोघांनाही त्यांचा साठा जाहीर करावा लागेल. यामुळे सरकारला व्यवस्थापन करणे सोपे जाईल. त्यामुळे दरावर नियंत्रण ठेवणे शक्य होईल. दरम्यान, गेल्या आठवड्यापासून डाळींच्या दरात वाढ होत आहे. डाळींचे दर शंभर रुपये किलोपर्यंत गेले आहेत. याचा फटका सर्वसामान्यांना बसला आहे.

संपादकीय

न्यायालयापुढे शीर्षासन

यापूर्वी बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांच्या उत्पादनाबाबत अनेक गंभीर तक्रारी आल्या होत्या. शासकीय प्रयोगशाळेतील तपासणीत त्यांची उत्पादने निकषानुसार नाहीत, असे आढळले होते. खरे तर सरकारने त्यावर कारवाई करायला हवी होती; परंतु बाबा रामदेव यांना या सरकारचा वरदहस्त असल्याने सरकार काहीच कारवाई करत नाही. फेमासारख्या कायद्याचा भंग करूनही सरकारने पतंजलीकडे दुर्लक्ष केले. नंतर तर विज्ञानाला आव्हान देण्याची भाषा सुरू झाली. विज्ञान आणि अध्यात्म ही वेगवेगळी शास्त्रे आहेत. विज्ञान कार्यकारणभावाला महत्त्व देते तर अध्यात्म मानवी भावभावनांना स्थान देते. विशेषतः आरोग्याचा आणि या दोघांचा संबंध येत असला, तरी आरोग्याच्या बाबतीत वैद्यकीय चिकित्सा महत्त्वाची असते. ॲलोपथी, युनानी, होमिओपॅथी, निसर्गोपचार, आयुर्वेद आदि उपचारपद्धती उपलब्ध असल्या, तरी त्यातील कोणतीही एक परिपूर्ण आहे, असा दावा करता येत नाही, तसेच एखादी उपचारपद्धती टाकाऊ आहे, असेही म्हणता येत नाही. या पार्श्वभूमीवर कोणतीही चुकीची जाहिरात करता येणार नाही, असे आता बाबा रामदेव यांना ठणकावण्यात आले असून त्यांनी मागितलेली माफीही न्यायालयाने मंजूर केली नाही.बाबा रामदेव यांना पतंजलीच्या औषधी उत्पादनांच्या जाहिरातींमध्ये सूचनांचे उल्लंघन केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने फटकारले. मागील सुनावण्यांमधील सर्वोच्च न्यायालयाचा संकेत रामदेव बाबांना पुरेसा इशारा देणारा होता. बाबा रामदेव यांचे योग क्षेत्रातील कार्य सलाम करावे असेच आहे; परंतु याचा अर्थ त्यांच्या पतंजली आश्रमाला काहीही करायला परवानगी मिळते, असे नाही. म्हणूनच बाबा रामदेव आणि पतंजली आयुर्वेदाचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण यांना दिशाभूल करणाऱ्या जाहिरात प्रकरणाशी संबंधित अवमान खटल्यात सर्वोच्च न्यायालयात वैयक्तिकरित्या हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. या प्रकरणी बाळकृष्ण यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. बाबा रामदेव यांनाही वैयक्तिकरित्या प्रतिज्ञापत्र द्यावे लागले. त्यांच्या वकिलाने सांगितले, की रामदेव यांना वैयक्तिकरित्या हजर राहून माफी मागायची आहे. त्यावर प्रतिज्ञापत्र आधी यायला हवे होते; न्यायालयाला विचारून प्रतिज्ञापत्र लिहिणार का? अशा शब्दांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने फटकारले.२१ नोव्हेंबर रोजी न्यायालयात प्रतिज्ञापत्र देऊनही पतंजलीने दिशाभूल करणारी जाहिरात दिली, यावर न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. बाबा रामदेव यांनी दुसऱ्या दिवशी पत्रकार परिषदही घेतली. त्यानंतर न्यायालय संतप्त झाले. अवमानाची कारवाई झाल्यानंतरच धडा घेतला जाईल का, अशी विचारणा न्यायालयाने केल्यानंतर सॉलिसीटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्र सरकारच्यावतीने हस्तक्षेप करत वकिलांशी बोलून योग्य प्रतिज्ञापत्र दाखल करून घेणार असल्याचे सांगितले. ३० नोव्हेंबर रोजी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात पतंजलीने न्यायालयात दावा केला की ते भ्रामक जाहिराती करत नाहीत; परंतु त्यानंतरही त्यांच्या जाहिराती सुरूच होत्या. त्यावेळी दिशाभूल करणाऱ्या जाहिराती थांबवण्यासाठी काय पावले उचलली आहेत, याबाबत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास केंद्राला सांगण्यात आले. पतंजलीने सतत दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध केल्याबद्दल जारी केलेल्या अवमान नोटीसला उत्तर दिले नाही. पतंजलीने यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाला आश्वासन दिले होते की ते आपल्या उत्पादनांच्या औषधी परिणामकारकतेचा दावा करणारे कोणतेही विधान करणार नाहीत किंवा कायद्याचे उल्लंघन करून जाहिरात करणार नाहीत.इंडियन मेडिकल असोसिएशनने पतंजलीच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या प्रकाशनाबाबत याचिका दाखल केली आहे. बाबा रामदेव यांच्याविरुद्ध कोविड-१९ च्या ॲलोपॅथी उपचाराविरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्याबद्दल अनेक राज्यांमध्ये खटले दाखल करण्यात आले आहेत. २०२२ मध्ये पतंजलीच्या गाईच्या तुपात भेसळ उघडकीस आली होती. उत्तराखंडमधील अन्न सुरक्षा विभागाने केलेल्या चाचणीत त्यांचे शुद्ध गाय तूप अन्न सुरक्षा मानकांची पूर्तता करत नाही, असे आढळले होते. हे तूप भेसळयुक्त आणि आरोग्यासाठी हानीकारक असल्याचे प्रयोगशाळेतील तपासणीनंतर आढळून आले. बाबा रामदेव यांनी ही चाचणी त्यांची कंपनीची तसेच देशी तुपाची बदनामी करण्याचे षड्यंत्र असल्याचे म्हटले होते. पतंजली नुडल्सबाबतही असाच वाद झाला होता.

मराठा पंच मंडळाचे कार्य कौतुकास्पद- जगताप

समाचार/नगर-दि.१७

मराठा समाज पंच मंडळाचे १०० वर्षापासून सुरू असलेले धार्मिकतेचे कार्य कौतुकास्पद असून त्यांनी श्री हनुमान व गणपती मंदिराची नव्याने उभारणी केली असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

बागडपट्टी शेरकर गल्ली येथे मराठा समाज पंचाचे तालीम पंचमंडळ व हनुमान मंदिर ट्रस्ट यांच्या वतीने श्री हनुमान व गणपती प्राणप्रतिष्ठापना आ. जगताप यांच्या हस्ते झाली, यावेळी अध्यक्ष शंकर दगडे, उपाध्यक्ष रामदास शेरकर, मनोज कर्डिले, चंद्रकांत बोरुडे, कर्नल यशवंत मिसाळ, सुधांशू मिसाळ, शिवाजी शिंदे, दीपक बिडवे, कैलास कर्डिले, राजू कांबळे, अजय ढोणे, पिंटू ढोणे आदी उपस्थित होते, शेरकर गल्ली येथील मराठा समाज पंचाचे तालीम पंचमंडळ यांच्या वतीने श्री हनुमान व गणपती मंदिराला शंभर वर्ष पूर्ण झाली होती आता नव्याने मंदिराची उभारणी करण्यात आली असून मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे

भीम पहाट कार्यक्रमास नगरमध्ये प्रतिसाद

समाचार/नगर-दि.१७

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी बौद्ध संस्कार संघाच्यावतीने 'भीम पहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रसिद्ध ऑक्रेस्ट्रा संगीतसितारे निवेदक विनय कसबेकर, अतुल थोरात गायिक रंजना मेहेत्रे, आशा वडागळे, लोकशाहीर शिवाजी शिंदे यांना अजित गुंदेचा (ढोलकी), अजिंक्य चौसाळकर (ऑर्गन), अभिनय कसबेकर (ऑक्टोपॅड) यांनी साथ दिली.

या कार्यक्रमास नोबेल पीस ॲरवॉर्ड नामांकित डॉ.सुधा कांकरिया, मनपा आयुक्त डॉ.पंकज जावळे, समाज भुषण परिमल निकम, इंजि.पी.बी.गायसमुद्रे, उद्योजक इंजि.अजित घोडके, मंडल अधिकारी मिलिंद जाधव, प्रा.रविंद्र गायकवाड, डॉ.प्रसाद सायगांवकर,डॉ.अजय साळवे, डॉ.योगेश सोनवणे, भाऊसाहेब आव्हाड, संतोष आहेर आदि उपस्थित होते.

आयुक्त पंकज जावळे म्हणाले, बौद्ध संस्कार संघाने समाजातील विविध घटकांसाठी राबवित असलेले उपक्रम हे समाजाची उन्नत्ती करणारे आहेत. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दुर्लक्षित समाजासाठी दिलेले योगदान हे अमुल्य असेच आहे. यावेळी डॉ. सुधा कांकरिया यांनी स्त्री जन्माच्या स्वागताची सामुहिक शपथ दिली. प्रास्तविक भाऊसाहेब देठे यांनी केले.

खांबांची 'सरोश'...

नगरमधील एक सर्वात भारी इंटरनॅशनल टॉकीज म्हणजे सरोश. या थिएटरच्या आत खांबच खांब आणि कधी दुर्दैवाने खांबामागची खुर्ची नशिबाला आली तर आपण सिनेमा पाहायला आलो की खांबा मागे लपून बसायला असा प्रश्न पडायचा. खांबामध्ये आला की सदैव डावीकडे किंवा उजवीकडे मान वळवून सिनेमा पाहावा लागायचा. एकाच वेळेला पडद्यावरचे धर्मेंद्र, हेमामालिनी दिसणे अशक्य. थोडक्यात मानमोडी होईल इतक्यावेळा डावी उजवीकडून वळून सिनेमाचा आनंद घ्यायचा. थोडक्यात नायक नायिका पूर्वी प्रेमप्रसंगी झाडामागे लपून छपून प्रेम करायचे. त्याचप्रमाणे प्रेक्षकाला ते खांबामागे लपून पहावे लागत असे. खांबामागची जागा येऊ नये म्हणून थिएटरमध्ये घुसून बिनखांबाच्या खुर्च्या पकडायच्या. गंमत म्हणजे कधी कधी एखादा माणूस सलग चारपाच खुर्च्यांवर रुमाल, फेटा इ. टाकून 'बैठेले है'... असं म्हणत जागा पकडून ठेवायचा. एसटीत पूर्वी जागांची पकडापकडी जशी असायची तसलाच हा प्रकार. बिनखांबाची जागा मिळाली तर केवढा आनंद व्हायचा! साधं तिकीट काढून थिएटरमध्ये जाऊन सिनेमा पाहणे, इतकी ही सोपी गोष्ट नव्हती. शिस्त आणि नगरी माणूस याचा पूर्वीपासून ३६ चा आकडा आहे आणि तिकीट काढायच्यावेळी तर तो नेहमीचा अनुभव. एकमेकांच्या अंगावर उड्या, रेटारेटी, त्यात कधी कधी एखाद्या शर्ट फाटायचा. गुंड्या तुटायच्या, हमरीतुमरी, शिवीगाळ... व पुढे जाने दो पैलवान म्हटलं की मग तंटा सुटला. 'कोहिनूर'मध्ये ॲडव्हान्स बुकींग करून निवांतपणे सिनेमा पाहणारांना यातली मजा नाही कळणार. उस वक्त फिल्म देखना एक जुनून था!

सरोश टॉकीजला आलेल्या काही सिनेमांच्या वेळी आम्हाला प्रत्यक्ष अनुभव आला त्यापैकी काही गमती. राजेश खन्ना आणि शर्मिला टागोर ही पन्नास वर्षांपूर्वी सर्वात गाजलेली जोडी आणि 'राजेश खन्ना' पोस्टरवर दिसला तरी सिनेमा फुल्ल! शर्मिला व राजेश या जोडीचा आविष्कार नावाचा सिनेमा सरोशला आला होता. आराधना, अमरप्रेम प्रमाणेच हा सिनेमा मस्त रोमॅन्टिक असेल अशा आशेने पब्लिकने गर्दी केली, पण आविष्कार म्हणजे कलात्मक (अर्थात बोजड व अनाकलनीय.) पब्लिक तासाभराच्या आतच बोअर झाली, वैतागली न गाणी, ना रोमान्स... शेवटी पब्लिकचा इतका गुस्सा की खुर्च्या तोडून टाकल्या. आरडा ओरडा वगैरे...अखेर आविष्कार आटोपात घेण्यात आला. दोन तीन दिवसातच आविष्कार गायब! असाच एक महाबोअर सिनेमा... विश्वजीतचा 'राहगीर'... पहिल्याच शो ला पब्लिकने धिंगाणा केला. त्या काळात निरोधची सारखी जाहिरात होत असे. काही लोकांनी त्याचे मोठमोठाले बलून (फुगे) फुगवून थिएटरमध्येच उडवायला सुरुवात केली. राहगीर एकाच दिवसात पिटाळून लावला. 'ये तो पब्लिक है... कुछ भी कर सकती है!

आणखी एक किस्सा 'शालीमार' (धर्मेंद्र, झिनत) त्या वेळचा शालीमार हा ७० एमएम सिनेमास्कोप चित्रपट साहजिकच स्क्रीनदेखील तसाच पाहिजे... पण एका सिनेमासाठी एवढा स्क्रीन कशाला बदलायचा? (आणि मुळात जागा पण नाही) अशावेळी सरोशच्या मॅनेजरने एक अफलातून आयडिया शोधली. जो रेग्युलर स्क्रीन होता, त्याच्या डाव्या बाजूला भिंतीवर चुना मारला व झाला ७० एमएम तयार! (अशी इंटरनॅशनल आयडियाची कल्पना फक्त नगरमध्येच साकार होऊ शकते.) असो... शालीमार पाहताना चुन्याच्या बाजूला धरम किंवा झिनी बेबी आली की चेहऱ्याला थोडी घडी पडायची किंवा तोंड वाकडं व्हायचं इतकंच! पण पब्लिकची नो तक्रार. शालीमार हाऊसफुल्ल.

दुपारी तीनचा शो निम्मा अधिक संपताना सरोशमध्ये कधी कधी एकदम चमत्कार व्हायचा. सिनेमाचा क्लायमॅक्स किंवा एखादा इमोशन प्रसंग स्क्रीनवर रंगात आलेला असतो. पब्लिक डोळ्यात जान आणून त्यात गढून गेलीय.... अशावेळी अचानक स्क्रीन मागे पाण्याच्या बादल्या, कळशी घेऊन जाणाऱ्या आकृती दिसू लागतात. त्याचे कारण म्हणजे नळाला पाणी आलेलं असतं. व ते भरणारे लोक येजा करीत असतात. (कनेक्शन कदाचित स्क्रीनच्या मागे असावं) तर अशा स्थितीतही पब्लिक सिनेमात दंग. सरोश टॉकीजच्या स्लाईड बनवणाऱ्याचं हिंदी अफलातून होतं. उदा. कलाकार... जॉकी शराफत, रुसी कपूर... अशी शुध्द हिंदीत लिहिलेली नावे असायची.

स्वातंत्र्यपूर्व काळी सरोशमध्ये प्रामुख्याने कॅम्प एरियातील इंग्रजी साहेबांसाठी सिनेमे दाखवले जायचे. स्वातंत्र्य चळवळीत सरोशमध्ये बॉम्बस्फोटही करण्यात आला होता. वगैरे... असो. पण सरोशचं कॅन्टीन एकदम इंग्लिश स्टाईल. कोट घातलेला वेटर, नगरमध्ये तेव्हा इथेच! इथे मिळणारं 'समरकुलर', 'डोनट', 'डिनररोल' परत कुठेही मिळाले नाहीत. तसेच सिगार, पाईपची टोबॅको फक्त इथेच! गेले ते दिन गेले. पुढे सरोशची दीपाली झाली व नंतर बंद. पण सरोशच्या आठवणी किमान आमच्या पिढीपुरत्या अजूनही ताज्या. त्यात खांब जास्त लक्षात!

- एजी. नगरवाला.

राशीभविष्य

- **मेष** : विवाहाची बोलणी होतील. व्यवसायात उलाढाल वाढेल. नव्या ओळखी लाभदायक ठरतील.
- **वृषभ** : आत्मविश्वासाने निर्णय घ्या. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. सामाजिक कार्यात सहभाग घडेल.
- **मिथुन** : सरकारी कामं रखडतील. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. व्यवसायात नुकसान संभवतं.
- **कर्क** : ग्रहमानाची अनुकूलता राहील. प्रलंबित कामांना गती येईल. नोकरीत बदली-बढतीचे योग आहेत.
- **सिंह** : कौटुंबिक वादविवाद संभवतात. शिक्षणक्षेत्रात अनुकूलता राहील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **कन्या** : कमी बोलणं हिताचं ठरेल. महत्त्वाची कामं मनाजोगी होतील. अनुभवींचा सल्ला कामी येईल.
- **तूळ** : व्यवसायात कामाचा ताण वाढेल. खरेदीचे व्यवहार मार्गी लागतील. उपजत गुणांना वाव मिळेल.
- **वृश्चिक** : प्रियजनांसाठी खर्च करावा लागेल. छोटा-मोठा प्रवास घडेल. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा.
- **धनु** : आर्थिक उत्कर्षाच्या संधी लाभतील. करारास अनुकूलता राहील. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **मकर** : रखडलेली कामं मार्गी लागतील. विद्यार्थ्यांच्या प्रगतीला वाव मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : महत्त्वाची वार्ता येईल. प्रेमप्रकरणात दिलासा मिळेल. घरात मंगलकार्याची बोलणी होतील.
- **मीन** : इतरांच्या वादात मध्यस्थी नको. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. प्रकृती उत्तम राहील.

सल्ला मोलाचा

निद्रानाशाची समस्या?

झोपण्याच्या आणि उठण्याच्या अनियमीत वेळा असल्यास शॉर्ट स्लिप सिंड्रोम अर्थात एसएसएस हा विकार होतो. कामामुळे किंवा एकूण बदललेल्या जीवनशैलीमुळे निद्राविकार उद्‌भवतात. या व्याधीची लक्षणं म्हणजे उत्साही न वाटणं, शरीर जड असणं, दिवसा एका डुलकीची अत्यंत गरज भासणं, रात्री उशिरापर्यंत या कुशीवरून त्या कुशीवर होणं, पडल्या पडल्या झोप न लागणं, रात्री झोप लागली तरी शांत आणि गाढ झोप न लागणं. यासाठी उपचार असून निद्रानाशाची तीव्रता जाणवणाऱ्या रुग्णांना याची गरज भासते.

लाईट थेरपी- नियमितपणानं रात्रपाळीत काम करणाऱ्यांना निद्रानाशाचा विकार जडल्यास ही थेरपी दिली जाते. यात एका लाईट बॉक्सच्या मदतीनं त्यांच्या रात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र केली जाते. क्रोनोथेरपी- रुग्णाच्या जीवनशैलीतच आमुलाग्र बदल घडवणारी ही उपचारपद्धती सहा दिवस दिली जाते. झोपण्याच्या अचूक वेळेपर्यंत आणि अवधीपर्यंत नेणारी ही उपचारपध्दती देऊन झोपण्याच्या वेळा सहा तासांनी पुढे ढकलत आदर्श वेळेपर्यंत आणल्या जातात.

१८ एप्रिल

दिनविशेष

- १९५५ : अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाइन यांचं निधन.
- १९८३ : बैरुतमध्ये अमेरिकेच्या वकीलातीवर हल्ला.
- २०१७ : बाबरी मशीद पाडल्याप्रकरणी लालकृष्ण अडवानी, मुरलीमनोहर जोशी आणि उमा भारती यांच्यासह काहीवर खटला चालवण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश.
- २०१८ : मुंबई बॉंबस्फोट प्रकरणातील फाशीची शिक्षा झालेल्या ताहिर मर्चंटचा मृत्यू.

महत्त्वपूर्ण काही

मंगळ ग्रहाविषयी...

प्रत्येकालाच मंगळ ग्रहाचं आकर्षण आहे. अमेरिकेतल्या नासानं तसंच भारतानंही मंगळाचा शोध घेण्यासाठी यानं सोडली आहेत. मंगळ ग्रहावर जीवसृष्टी आहे का, याचा शोध लावला जातोय. जीवसृष्टीच्या अस्तित्वाचा पहिला टप्पा म्हणजे पाणी. मंगळ ग्रहावर पाणी असल्याचे पुरावे शास्त्रज्ञांना सापडले आहेत. मंगळावर वाहतं पाणी आहे याचाच अर्थ तिथे जीवसृष्टी असू शकते. मंगळाबद्दल सगळं जाणून घ्यावंसं वाटत असेल तर नासाची ारी.परीर.सीं.ळप या नावाची एक वेबसाईट आहे. सामान्यांना मंगळाबद्दल सगळं काही कळावं, यासाठीच नासानं ही खास साईट बनवली आहे. प्रोग्राम्स अँड मिशन्स या विभागात गेल्यावर नासाच्या मंगळविषयक मोहिमांची आणि कार्यक्रमाची माहिती मिळून जाईल. ऑल अबाऊट मार्स या विभागात मंगळ ग्रह नेमका कसा आहे, हे तुम्हाला कळू शकेल. मल्टिमिडियात मंगळ ग्रहाचे व्हिडिओज, थ्रीडी इमेजेस पाहता येतील. वेज टू इंटरॲक्ट या विभागातही भरपूर ॲक्टिव्हिटिज आहेत.

आरोग्यमंत्र

जाणा अश्रूंचं महत्त्व

अश्रू ही दुखद भावनांची अभिव्यक्ती आहे. दुखद घटनेला सामोरं जाताना, अशा घटनांच्या आठवणीने अथवा निव्वळ आशंकेनेही डोळ्यात अश्रू येतात. सुखाच्या प्रसंगीही डोळ्यात अश्रूंची दाटी होते. पण अशाप्रकारे भावनेशी संबंधित अश्रूंकडे डोळ्याची संरक्षण प्रणाली म्हणूनही पाहिलं जातं. अश्रूग्रंथी अविरत अश्रूनिर्मितीचं काम करतात. मात्र काही कारणास्तव त्यांच्या कामात अडथळे उत्पन्न झाल्यास डोळ्यांचं नुकसान संभवतं. अश्रू आटण्याच्या या प्रक्रियेने डोळ्यांमध्ये ताण जाणवतो, पापण्या जड होतात. नजर धूसर होते. या कारणामुळे डोळ्याला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा थांबतो आणि संसर्गाची शक्यता वाढते. अश्रू संसर्ग कमी करण्याचं काम करत असतात. म्हणूनच ड्राय आय या व्याधीत डोळे वारंवार संसर्गजन्य आजारांना बळी पडतात. डोळ्यातील अश्रूग्रंथींचं काम थांबल्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. उदा. डोळ्यात धूळ अथवा मातीचा कण गेला तर खळखळ पाणी येवून तो बाहेर ढकलला जातो. पण अश्रूंची निर्मितीच होत नसेल तर या कामात अडथळा येतो आणि डोळ्यात गेलेले घटक बुबुळावर घासले जाऊन जखमा होण्याची शक्यता वाढते. वेळीच दखल घेतली गेली नाही तर यामुळे अंधत्व येण्याची शक्यताही वाढते. म्हणूनच डोळ्यांच्या शुष्कतेकडे गांभीर्याने पहायला हवं. या समस्येवर उपाय म्हणून रिफ्रेश टिअर ड्रॉप उपलब्ध आहेत. तज्ज्ञांच्या सल्ल्याने याचा वापर करता येतो.



टेक्नो टॉक

मोबाईलवर इंटरनेटचं बिल वाचवण्याच्या या स्मार्ट टिप्स. ✻ स्मार्टफोनमध्ये ऑटो अपडेटचा ऑप्शन बंद ठेवा. ✻ मोबाइल डाटा लिमिट सेट करा. ✻ नोटिफिकेशन बंद ठेवा. ✻ बॅकग्राउंड डाटा बंद ठेवा. यामुळे बिनकामाच्या ॲप्सवर डाटा खर्च होणार नाही. ✻ एचडीऐवजी कमी रिजोल्यूशनवाले व्हिडिओ बघा. ✻ फ्री कॉलिंगुळे तुमचा बराच डाटा खर्च होतो. त्यामुळे शक्यतो फ्री कॉलिंग टाळा. ✻ फ्री गेम्स खेळत असताना खाली झळकणाऱ्या ॲड्समुळे डाटा वाया जातो. त्यामुळे गेम्स खेळताना डाटा बंद ठेवा. ✻ डाटा कंप्रेसचा ऑप्शन ऑन केल्याने डाटाचा वापर कमी होतो.

पंचांग

गुरुवार, १८ एप्रिल २०२४
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र शु. १०, नक्षत्र : आश्लेषा
चंद्रराशी : कर्क, गंड योग
सूर्योदय: ६.२१, सूर्यास्त: ६.५५

फॉरवर्डस

नशिबापुढे कोणाचं काही चालत नाही...

कितना बेबस है इन्सान
किस्मत के आगे
हर सपना टूट जाता हैं
हकीकत के आगे

करिअरवाटा

लॉ मध्येही स्पेशलायझेशन

हा काळ स्पेशलायझेशनचा असला तरी अद्याप कायद्याच्या क्षेत्रामध्ये स्पेशलायझेशनचा म्हणावा तेवढा बोलबाला झालेला नाही. फौजदारी आणि मुलकी खटले हाताळणारे वकील असं ढोबळ वर्गीकरण या क्षेत्रात रूढ आहे. परंतु आता विशिष्ट कायद्यांचा विशेष अभ्यास करून त्यातच करिअर करण्याची कल्पना पुढे येत आहे. पर्यावरणविषयक कायदे, आरोग्यविषयक कायदे, ग्राहकांच्या विषयीचे कायदे, कंपन्यांच्या व्यवहाराविषयीचे कायदे अशा विविध शाखा विकसित होत आहेत. त्यामुळे कायद्याची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण घेताना यातल्या कोणत्या तरी एका विषयाचे स्पेशलायझेशन करण्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा आहे. काळाची ही गरज ओळखून विविध विद्यापीठांनी असे विशेष अभ्यासक्रम सुरू केले आहेत आणि भारतातली काही विद्यापीठे त्यासाठी प्रसिद्धही आहेत. दिल्लीतील नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी या विद्यापीठामध्ये अशा विशिष्ट अभ्यासक्रमांची योजना आहे. तिथे इन्टेलेक्च्युअल प्रॉपर्टी ॲक्ट, एनर्जी ॲक्ट, व्हेंच्युअर कॅपिटल ॲक्ट अशा वेगळ्या कायद्यांचे अभ्यासक्रम आहेत. मल्टिनॅशनल कंपन्या नियमितपणे वकिलाचा सल्ला घेत असल्यामुळे संधीचा फायदा घेऊन लॉ फर्मस कार्यालये स्थापत आहेत.

खेचाखेची

वाईट वाटून घेऊ नका

पत्नी तुमचं ऐकत नसेल, तुमच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत असेल आणि प्रसंगी तुम्हाला दोन गोष्टी सुनावतही असेल तर...

.
.
.
.
.

...फार लक्ष देऊ नका. प्रत्येक विवाहित पुरुषाची पत्नी असंच वागते.

वेगळं काही

मत्स्यालयात तुम्ही स्टारफिश पाहिला असेल. एखाद्या ताऱ्यासारखाच त्याचा आकार असतो. पण तो मुळात मासा नसतोच. तो एक समुद्री प्राणी आहे. त्याच्या हाडांमध्ये कॅल्शियम असतं. तसंच त्याच्या शरीराचा बराचसा भाग पाण्यापासून तयार झालेला असतो. त्याच्या २००० पेक्षा जास्त प्रजाती आहेत. ते फक्त खाऱ्या पाण्यातच आढळतात. स्टारफिशला पाच तर काही ४० हात असतात. ते आपले हात पुन्हा तयार करू शकतात. पकडले गेल्यास आपले हात तसेच सोडून पळून जातात. त्यांचे हात पुन्हा तयार होतात. आकार ४ ते ११ इंचांपर्यंत असतो तर वजन ११ पाउंड असतं. काही स्टारफिश ३५ वर्षांपर्यंत जगतात.

फॅशन पॅशन

अंतर्वस्त्र निवडताना...

अंतर्वस्त्रांची खरेदी काळजीपूर्वक आणि पुरेसा वेळ हाती ठेवून करावी. अंतर्वस्त्रांचं फिटिंग योग्य असेल तरच पेहराव उठून दिसतो. पण बरेचदा ही काळजी घेतली जात नाही. डीप नेक ड्रेस परिधान करताना चुकीची ब्रा घातली जाते आणि हसं होतं. हे टाळायचं तर काय करावं?

✻ डीप नेकलाईन ड्रेससाठी ब्रा ऐवजी डक्ट टेपचा उपयोग करावा. ब्रेस्टलाईन जास्त असणाऱ्या महिलांसाठी हा सर्वोत्तम पर्याय आहे. पण टेप काढताना काळजी घ्यावी. यात चूक झाली तर त्वचेला हानी पोहोचू शकते. ✻ बॅक एक्सटेंड स्ट्रीप्स खालच्या बाजूने ब्रा ची उंची खेचतात. त्यामुळे डीप नेकलाईन ड्रेसमध्ये हूक दिसून येत नाहीत. लो बॅक किंवा हॉल्टर गाऊन्ससाठी बॅक एक्सटेंड स्ट्रीप्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. ✻ ड्रेस बॅकलेस असेल आणि नेकलाईनही डीप असेल तर ब्रा ऐवजी सिलिकॉन पेस्टीचा पर्याय उत्तम आहे. या पेस्टीज ब्रेस्टवर चिकटवायच्या असतात. यामुळे ड्रेसला समोरून स्मूथ फिनिशिंग मिळतं त्याचबरोबर पॅडिंग सपोर्टही मिळतो. ✻ डीप नेकलाईन आणि समोरून शीर फॅब्रिकचं मिक्स्चर असेल तर प्लंज ब्रा वापरावी.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

बुधवार, दि. १७ एप्रिल २०२४ पान ३

सुविचार

जेव्हा तुम्हाला समजते तुमच्याकडे आता हारण्यासाठी काही उरले नाही तेव्हा तुम्ही खऱ्या अर्थाने जिंकण्यास सज्ज होता. **संकलित**

सामान्यज्ञान

अमेरिकेत पहिली विमान सेवा १ जानेवारी १९१४ मध्ये सुरु झाली. विमान होते बेनोईस्ट फ्लाईग बोट व वैमानिक होता टॉनी जानूस. **संकलन - अरविंद ब्राम्हणे**

झेंडीगेट परिसरात अडीच हजार किलो गोमांस पकडले

समाचार/नगर-दि.१७

शहरातील झेंडीगेट परिसरातील कुरेशी मोहल्ला, आंबेडकर चौकातून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन हजार सहाशे साठ किलो गोमांस जप्त करत ११ गोवंश जातीच्या जनावरांची सुटका केली. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत २५ लाख ६८ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी शोएब रौफ कुरेशी, फैसल अस्लम शेख, अदनान फिरोज कुरेशी, मुसाविर इन्नुस कुरेशी, ओवेस रशिद शेख, अल्तमश अस्लम कुरेशी, सर्व (रा. व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट, नगर) यांना ताब्यात घेतले असून फैजान इद्रिस कुरेशी, सुफियान ऊर्फ कल्लु इद्रिंस कुरेशी हे दोघे पसार आहेत. अधिक माहिती अशी की, पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना महाराष्ट्र राज्यात बंदी असलेले गोवंशीय जनावरांची हत्या करुन गोमास वाहतूक व विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्या

पथकाला झेंडीगेट परिसरात एका पत्र्याच्या शेडमध्ये गायींची कत्तल करून गोमांस विक्री होत असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचत झेंडीगेट परिसरातून ७ लाख ९८ हजार रुपये किंमतीचे २ हजार ६६० किलो वजनाचे गोमांस, ७ लाख ७० हजार रुपये किंमतीची ११ गोवंश जातीची जिवंत जनावरे, ६ लाख रुपये किंमतीचा १ पिकअप टेम्पो, ४ लाख रुपये किंमतीचा १ टेम्पो व ४०० रुपये किंमतीची सुरी व सत्तुर असा एकुण १५ लाख ६८ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करत सहा जणांना ताब्यात घेतले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे,उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक तुषार धाकराव, अंमलदार भाऊसाहेब काळे, बापुसाहेब फोलाणे, संदीप पवार, सचिन अडबल, संतोष लोढे,

संतोष खैरे, रविंद्र घुगांसे, शिवाजी ढाकणे, रोहित मिसाळ, रणजित जाधव, भाऊसाहेब काळे यांच्या पथकाने केली आहे.

खोट्या सहानुभूतीला पारनेरची जनता थारा देणार नाही- खा. विखे

समाचार/नगर-दि.१७

भावनांशी खेळून मत मागणे आपल्याला जमत नाही. डॉक्टर या नात्याने रूग्णांना सेवा देतानाचे व्हिडीओ काढणे आपल्याला पसंत नाही. केलेल्या विकास कामांवर आपण मतदान मागत आहोत. लोकसभेची ही निवडणूक देशाचे भवितव्य घडवणारी आहे. युवकांचे भविष्य आपल्याला घडवायचे आहे. पारनेर तालुक्यातील जनता खोट्या सहानुभूतीला यावेळी थारा देणार नाही, असे प्रतिपादन खा. सुजय विखे यांनी केले.

पारनेर तालुक्यात आयोजित कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे , विश्वनाथ कोरडे , प्रशांत गायकवाड, सोनाली चालके, बंडू रोहकले, बाबासाहेब खिलारी, सचिन वराळ, रवींद्र पुजारी आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. खा.विखे म्हणाले की,लोकसभा निवडणूक ही देशाच्या दृष्टीने महत्वाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षात केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा मांडून भाजपा मतदान मागत आहे. पाच वर्षात केंद्र सरकारच्या योजनाचा लाभ सामान्य माणसापर्यंत पोहचवला आहे. प्रामाणिकपणे केलेली कामे आपण लोकांमध्ये जावून सांगत आहोत. इतरांसारखी खोटी सहानुभूती आपल्याला मिळवायची नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

करोना संकटात डॉक्टर नात्याने आपणही हजारो रुग्णांची सेवा केली. पण समोर रूग्ण मरणांशी झुंज देत असताना त्याच्यावर उपचार करतानाचे व्हीडीओ टाकण्याचा मोह आपल्याला कधी झाला नाही आणि होणारही नाही असे सांगून डुप्लीकेट व्हिडीओ करून राजकारण करण्याची पध्दत आमची नाही. विखे परिवार लोकंमध्ये जावून काम करतो. लोकांच्या सुख- दुखात सहभागी होवून लोकांचे पाठबळ मिळवतो, असे ते म्हणाले. खोट्या सहानुभूतीला यापुर्वी पारनेर तालुका फसला. आता पुन्हा ती चूक या तालुक्यातील जनता करणार नाही असा विश्वास खा. विखे यांनी व्यक्त केला.

अर्बन बँक गैरव्यवहार प्रकरणी चौघांचे जामीन अर्ज नामंजूर

समाचार/नगर-दि.१७

नगर अर्बन बँक कर्ज गैरव्यवहारप्रकरणी चौघांचे जामीन अर्ज न्यायालयाने नामंजूर केल्याची माहिती ॲड. अनिल घोडके यांनी दिली. २९१ कोटींच्या या घोटाळा प्रकरणी अटकेत असलेल्या व काही संशयित असलेल्यांनी नियमित व अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केले होते. त्यांना जामीन नाकारण्यात आला आहे.

मनोज वसंत फिरोदिया (सहाय्यक मुख्य व्यवस्थापक), चंद्रकांत मोरे (कर्जदार), अविनाश प्रभाकर वैकर (कर्जदार), प्रविण सुरेश लहारे यांनी जिल्हा न्यायालयात जामीन अर्ज दाखल केले होते. त्यावर जिल्हा सत्र न्यायाधीश प्रशांत सित्रे यांच्यासमोर सुनावणी झाली. सरकार पक्षाच्यावतीने ॲड. घोडके यांनी युक्तीवाद केला. सन २०१३ ते २०१९ या काळात आरोपींनी अनेक कर्ज प्रकरणात खोटे कागदपत्र, मिळकतीचे बनावट अहवाल, इतर बनावट कागदपत्रे करून प्रकरणे मंजूर केली. आरोपींच्या खात्यावर संशयास्पद रक्कम आल्याचे दिसून येत आहे. ऐपत नसताना अनेक कर्ज मंजूर केल्याचे दिसत आहे. फॉरेन्सीक ऑडीटमध्ये अनेक प्रकरणात आरोपीचा सहभाग दिसून येत आहे, त्यामुळे आरोपींना जामीन देऊ नये, असा युक्तिवाद त्यांनी केला. ठेवीदारांच्या वतीने ॲड. अच्युत पिंगळे यांनी युक्तीवाद केला. त्यानंतर चौघांचे जामीन अर्ज न्यायालयाने नामंजूर केले.

पान १ वरुन

६ आरोपींच्या एलसीबीने मुसक्या आवळल्या

सुपा पोलिस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांनी घटनेच्या तपासकामी दोन विशेष पथके नियुक्त केली होती. पोनि आहेर यांना माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा रमेश भोसले याने त्याच्या इतर साथीदारासह केला असून तो कामरगाव शिवारातील हॉटेलजवळ येणार आहे. आहेर यांच्या सूचनेवरून गुन्हे शाखेच्या पथकाने कामरगाव शिवारातील हॉटेलजवळ सापळा लावला असता, एक इसम पायी येताना पथकास दिसला. पथकाने त्यास ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव रमेश ऊर्फ मुकेश सीताराम भोसले (वय ३०, रा. विठ्ठलवाडी रोड, कामरगाव, ता. नगर) असे असल्याचे सांगितले. त्याच्याकडे विचारपूस केली असता, २ दिवसांपुर्वी त्याचे इतर साथीदार दिनेश भोसले, सागर भोसले, शशिकांत भोसले, वसिम भोसले, राहुल भोसले (सर्व रा. विठ्ठलवाडी रोड, कामरगाव शिवार, ता. नगर), पायल काळे (रा. भोरवाडी, ता. नगर) यांनी रांजणगांव मशिद येथील एका घरातील लोकांना लाकडी दांडके व कत्तीने मारहाण करुन चोरी केल्याचे सांगितले. त्यानंतर पथकाने विठ्ठलवाडी रोड येथून दिनेश वतन्याब भोसले (वय ३३), सागर पानतास भोसले (वय २२), शशिकांत ऊर्फ सोंड्या सीताराम भोसले (वय २४), वसिम वत-याब भोसले (वय १९), राहुल रवि भोसले (वय २४ सर्व रा. विठ्ठलवाडी रोड, कामरगाव शिवार, ता. नगर) त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. पायल काळे (रा. भोरवाडी, ता. नगर) हा पथकाला मिळून आला नाही. गुन्हे शाखेने आरोपींकडून १५ ग्रॅम वजनाचे १ लाख ५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र, ५ ग्रॅम वजनाचे ३७ हजार ५०० रुपये किंमतीचे डोरले, २४ हजार ५०० रुपये रोख, १ लाखाची मोटार सायकल व १ हजार ५०० रुपये किंमतीच्या २ कत्ती व १ तलवार असा एकुण २ लाख ६८ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

महिला, युवक, शेतकऱ्यांना समर्पित- मंत्री विखे

मोठी उपलब्धी ठरली आहे. नागरिकांच्या सुचनांमधून तयार झालेल्या या संकल्प पत्रात भारताच्या अंतरराष्ट्रीय संबधापासून ते देशाच्या सुरक्षा व्यवस्थेपर्यंत. समृध्द भारत, सुशासन, स्वस्थ भारत, शिक्षण, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांच्या विकासाबरोबरच इनोव्हेशन, टेक्नॉलॉजी आणि पर्यावरण यांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. २०४७ सालापर्यंत विकसीत भारत निर्माण करण्याचे उदिष्ट पुर्ण करण्यासाठी युवाशक्ती, नारीशक्ती, शेतकरी आणि गरीब यांना सशक्त करण्याचा संकल्प करण्यात आला असून, रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रीत करतानाच स्टार्टअप योजनेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे,असे विखे यांनी सांगितले.

नगरमध्ये रामनवमी उत्सवाचा जल्लोष

पाईपलाईन रस्त्यावरील पंचवटीनगर येथील श्रीराम मंदिर या सर्व ठिकाणी राम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान, आज सायंकाळी श्रीरामनवमीनिमित्त शहरातून मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांचे बारीक लक्ष राहणार आहे. मिरवणुकीवर ड्रोन कॅमेऱ्याची नजर असणार आहे. यासह पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मिरवणूक मार्गावरील संवेदनशील ठिकणांवर फिक्स पॉइंट लावण्यात आले आहेत. त्याठिकाणी पोलिसांचा अधिक बंदोबस्त राहणार आहे. पोलिस उपअधीक्षक दोन, पोलिस निरीक्षक सहा., एपीआय पीएसआय २३, अंमलदार ३४५, आरसीपी प्लाटून १, एसआरपीएफ प्लाटून १ असा बंदोबस्त आहे.

सुंदर हस्ताक्षरावर चितांबर विद्यालयात वर्ग

समाचार/नगर-दि.१७

येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिर मध्ये रोटरी क्लब ऑफ अहमदनगर यांच्या सहकार्याने हस्ताक्षर शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील प्रसिद्ध हस्ताक्षरतज्ज्ञ अशोक सप्तर्षी यांनी शिबिरात विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी विषयाचे सुंदर हस्ताक्षर काढण्याबद्दल मार्गदर्शन केले.या हस्ताक्षर वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव देशमुख यांनी सुंदर हस्ताक्षर हा उत्तम व्यक्तिमत्त्वाचा भाग असल्याचे सांगितले. व्यासपीठावर रोटरी क्लबचे सचिव दीपक गुजराथी, क्लबच्या फर्स्ट लेडी देशमुख, मंडळाचे सचिव निलेश वैकर, मुख्याध्यापिका विभावरी रोकडे आदी होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना सुंदर हस्ताक्षर आणि लेखन कौशल्याचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने शिबिरात सहभागी झाले होते.

भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व शिबिर

समाचार/नगर-दि.१७

भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे ज्या विद्यार्थ्यांनी यावर्षी दहावीची परीक्षा दिली आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी मोफत व्यक्तीमत्व विकास (पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट कोर्स) शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

अपराईज टचुटोरियलच्या सहकार्याने सदर शिबिर दि. १९ एप्रिल पासून शाळेतच होणार आहे. व्यक्तीमत्व विकासासाठी संवाद कौशल्य, संघ भावना, अंगभूत कौशल्यांचा विकास, व्यासपीठावर विचार व्यक्त करणे यावरही शिबिरात मार्गदर्शन केले जाणार आहे.त्याचबरोबर या शिबिर करिअर मार्गदर्शन देखील करण्यात येणार आहे.

त्यामध्ये समुपदेशनाव्दारे विद्यार्थ्यांचा कल ओळखून शैक्षणिक शाखा निवडीसाठी मार्गदर्शन करणार आहे. या शिबिरात सी.ए. उमेश दोडेजा, प्रा. प्रज्ञा मुनोत, सीए चिराग कासवा, इंजि. चेतन नवलानी, सीए, सीएस यश डागा, ॲड. निकिता मुथा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

शशिकला दसरे यांचे निधन

समाचार/नगर-दि.१७

सिद्धेश्वर न्यूज एजन्सीचे सुनिल गटणे यांच्या सासूबाई व समुउपदेशेक विवेक दसरे यांच्या मातोश्री श्रीमती शशिकला वसंतराव दसरे यांचें वृध्दापकाळान निधन झाले.

त्या ८८ वर्षाच्या होत्या मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. शशिकला यांना गाण्यात आवड होती त्यांना एक मुलगा, सून, तीन मुली, जावई, नातवंडे, दोन बहिणी असा परिवार आहे.

समाचार

वाचकांना नम्र सूचना

समाचार वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

हनुमान चालिसा

मंगल भक्त सेवा मंडळ

बुधवार, दि. १७ एप्रिल २०२४

रात्रौ ८.३०

- स्थळ -

नवनाथ तरुण मंडळ

सुडके मळा, बालिकाश्रम रोड

नरेश लांडगे

श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ

बुधवार, दि. १७ एप्रिल २०२४

रात्रौ ८.३०

- स्थळ -

श्रीराम मंदिर

देशमुख नगर, नागरदेवळे, भिंगार,अहमदनगर

श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ

बुधवार, दि. १७ एप्रिल २०२४

रात्रौ ८.३०

- स्थळ -

श्रीराम मंदिर/स्वराज प्रतिष्ठान

दसरेनगर, छत्रपती संभाजीनगर रोड,

किशोर दाने, कृष्णा नरोडे, भाऊसाहेब आव्हाड, अजित शहाणे

श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)

बुधवार, दि. १७ एप्रिल २०२४

रात्रौ ८.३०

- स्थळ -

लखमीचंदजी जग्गड परिवार

शिवालय, नगर वाचनालय समोर, नेता सुभाष चौक

अलवाल,कोंडा यांचा निवडीबद्दल सत्कार

समाचार/नगर-दि.१७

जिद्द, मेहनत, चिकाटी आणि आपल्या अंगी असलेल्या शारीरिक व बौद्धिक, नैपुण्याच्या जोरावर हमखास यश मिळवता येते. अनिल अलवाल यांनी पोलिस उपनिरीक्षक पदावर निवड व्हावी, यासाठी अनेक प्रयत्न केले. जिद्द, चिकाटी, मेहनत माध्यमातून यश त्यांनी मिळविले. त्याचे हे यश आज अनेक तरुणांना प्रेरणा देणार आहे, असे प्रतिपादन मनपाचे माजी उपायुक्त दिगंबर कोंडा यांनी केले.

अनिल अलवाल यांची एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल तसेच अमोल कोंडा यांची केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत विमान उड्डाण अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मनपाचे माजी उपायुक्त दिगंबर कोंडा बोलत होते. याप्रसंगी पद्मशाली सोशल फाउंडेशन चे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, रोहित गुंडू, कृषी अधिकारी ओंकार यन्नम, इंजि. अक्षय बल्लाळ,, शुभम सुंकी, रोहित अलवाल, पोलीस कॉन्स्टेबल निलेश अलवाल,सौ.नीता बोद्दुल आदी उपस्थित होते.

यावेळी इंजिनियर अक्षय बल्लाळ, कृषी अधिकारी ओंकार यन्नम, निलेश अलवाल, रोहित गुंडू, अक्षय यन्नम यांनी मनोगत व्यक्त केली. प्रास्ताविक फौंडेशनचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी यांनी केले. पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेले अनिल अलवाल म्हणाले कि, माझ्या आई वडिलांचे स्वप्न मी साकार करू शकलो, याचा मला आनंद आहे. माझ्या या यशामध्ये माझ्या मेहनतीचा जेवढा वाटा आहे तेवढाच वाटा माझ्या पाठीशी ठामपणे उभ्या असलेल्या माझ्या दोन्ही भावांचा आहे.

पाऊलबुधे फार्मसीमध्ये विद्याशाखा विकास कार्यक्रम

बदलत्या शिक्षण पद्धतीमुळे शिक्षकांनी सतर्क रहावे- खुराणा

समाचार/नगर-दि.१७

प्रभावशाली शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या कायम लक्षात राहत असते. त्यासाठी शिक्षकांनी आपला व्यक्तिमत्व विकास करावा, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास असावा. शिकवण्याची पद्धत, शिक्षकांचे शिकवणे परिणामकारक कसे होईल यावर भर द्यावा. पूर्वीचे विद्यार्थी आणि आत्ताचे विद्यार्थी यामधील झालेला बदल लक्षात घेता शिक्षकाने स्वतःमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे. इंटरनेट, सोशल मिडिया यामुळे विद्यार्थ्यांची जिज्ञासा वाढत आहे. त्यांच्या प्रश्नांचे समाधान करण्यासाठी आज बदलत्या शिक्षण पद्धतीनुसार शिक्षकांना अपडेट राहणे आवश्यक झाले आहे, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. रेखाराणी खुराणा यांनी केले.

सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ.ना.ज.पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये नुकताच फॅकल्टी डेव्हलमेंट प्रोग्राम अंतर्गत विद्याशाखा विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुख्य वक्त्या बी.एड .कॉलेजच्या प्राचार्या डॉ.रेखाराणी खुराणा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. निलेश जाधव आणि डी फार्मसीच्या प्राचार्या अनुराधा चव्हाण तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.

शिक्षकांचे शिष्टाचार, शिकवण्याच्या पद्धती आणि चांगल्या शिकवण्याच्या पद्धती वाढवणे यावर भर देत शिक्षकांचा विकास कसा होईल, यावर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रा.अमृता रत्नपारखे, प्रा.डॉ. पुजा मचे, स्मिता चासकर यांच भाषणे झाली. पॉलिटेक्निक कॉलेज नारायणडोहचे प्रा. सागर बोठे सर यांनी आपल्या मनोगतात हा परिसंवाद आमच्यासाठी चांगला उपयोगात येईल आणि शिक्षकांमध्ये यामुळे खूप चांगला बदल होईल असे सांगितले.

पंचशिल प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

समाचार/नगर-दि.१७

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त भिंगार येथे पंचशील प्रतिष्ठानच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर चाबुकस्वार, कॅन्टो. बोर्डचे माजी उपाध्यक्ष संभाजीराव भिंगारदिवे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विठ्ठलराव लोखंडे, ज्येष्ठ नागरिक बाळासाहेब भिंगारदिवे, संतोष धीवर, प्रल्हाद भिंगारदिवे, अच्युत गाडे, श्रीकांत पतके, कैलास वाघस्कर, संतोष सुळे, रूपाली सुळे, सुभाष होडगे, सी.एम. पाटोळे, भाऊ भिंगारदिवे आदि सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सागर चाबुकस्वार म्हणाले, पंचशिल प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थी ही देशाचे भविष्य असल्याने त्यांना शैक्षणिक मदतीचा हात दिला असल्याचे सांगितले. बाळासाहेब भिंगारदिवे यांनी डॉ. आंबेडकर यांचे नगरमधील भेटी व वास्तव्याबाबत माहिती दिली. संतोष धिवर यांनी आभार मानले.

भिंगारच्या पूजा वराडेची पोलिस उपनिरीक्षकपदाला गवसणी

समाचार/नगर-दि.१७

भिंगार येथील आंतरराष्ट्रीय धावपटू पूजा रमेश वराडे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करुन तिची पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्ती झाली आहे. सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या वराडे हिने आंतरराष्ट्रीय धावपटू ते पोलीस अधिकारी होण्याचा मान मोठ्या जिद्दीने मिळवला आहे.आंतरराष्ट्रीय धावपटू असलेल्या व भिंगार एक्सप्रेस म्हणून ओळख निर्माण केलेल्या पूजा वराडे हिने पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली आहे. पूजा हीचे प्राथमिक शिक्षण, भिंगार हायस्कूल येथून व माध्यमिक शिक्षण न्यू आर्टस ॲण्ड कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयात पदवी शिक्षण घेतले आहे. पूजाचे वडील रमेश वराडे राज्य परिवहन मंडळाचे निवृत्त कर्मचारी आहे. तर आई सुनिता वराडे गृहिणी असून, दोघांनी तिला स्पर्धा परीक्षेसाठी प्रोत्साहन दिले. पूजाने शालेय जीवनापासूनच अधिकारी होण्याचे स्वप्न मनाशी बाळगले होते. तर ती उत्कृष्ट धावपटू असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर बक्षीस पटकाविले आहे. पूजा वराडे हिने आपले यशाचे श्रेय आई, बाबा व मोठा भाऊ कौस्तुभ यांना दिले असून, प्रत्येकाकडे एक कला असते ती दाखवण्याची हिंमत दाखवयाला हवी, असे तिने सांगितले.

आकाशवाणीची लोकप्रियता टिकून - छाजेड

समाचार/नगर-दि.१७

विविध योजनांची माहिती, ताज्या घडामोडी, बातम्या आदी माहिती देशातील नागरिकांना आपल्या खास शैलीत देणारे एक मोठे शासकीय माध्यम म्हणजे आकाशवाणी होय. आज खाजगी संस्था रेडिओ प्रसारणात उतरल्या असल्या तरीही देशाच्या कुठल्याही कोपऱ्यात पोहोचणारी 'आकाशवाणी' आपली लोकप्रियता टिकवून आहे. नगरच्या आकाशवाणी केंद्रानेही गेल्या ३३ वर्षांपासून नगरकरांच्या मनामध्ये वेगळे स्थान निर्माण केले आहे, असे प्रतिपादन प्रमोदकुमार छाजेड यांनी केले. अहमदनगर आकाशवाणी केंद्राच्या ३३ व्या वर्धापन दिनानिमित्त स्नेह ७५ च्या वतीने नगर आकाशवाणी केंद्राचे प्रमुख राजेंद्र दासरी, बढे, उद्घोषिका सुषमा अमर, विद्या जोशी, देशमाने यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी स्नेह ७५ चे विनोद सोलंकी, ईश्वर सुराणा, बाळासाहेब रेणाविकर, रजनी ढोरजे, प्रमोदकुमार छाजेड आदी उपस्थित होते. केंद्र प्रमुख राजेंद्र दासरी म्हणाले, आकाशवाणी हे खेड्या-पाड्यांपर्यंत पोहचलेले सर्वात मोठे साधन आहे. यानिमित्त देश-विदेशातील घडामोडी सर्वांपर्यंत सहज पोहचल्या जातात. आजच्या मोबाईलच्या जमान्यातही आकाशवाणीने आपले अस्तित्व टिकून ठेवले आहे. श्रोत्यांच्या सहकार्याने नगर आकावाणीने ३३ वर्ष सेवा केली आहे. स्नेह-७५ च्या सत्काराने आमचा उत्साह आणखी वाढणारा आहे, असे सांगितले. प्रमोदकुमार छाजेड यांनी आकाशवाणी (रेडिओ) विषयीच्या जुन्या आठवणी सांगितले. विद्या जोशी यांनी आभार मानले.

सामान्यातील असामान्य

४ लाख स्टॅम्प ८० हजार पोस्टकार्डचा संग्राहक - उमेश

प्रत्येकाचे छंद वेगवेगळे असतात. अनेकजण लहानपणी आवडीनं विविध छंदाकडे आकर्षित होतात. परंतु हे छंद वाढत्या वयानुसार आयुष्यभर फार कमी लोकांची साथ सोबत करतात. असाच आपल्या लहानपणापासून एक नव्हे तर विविध छंद जोपासणारे मुंबईतील उमेश जाधव नावाचे अवलिया आहेत. आता त्यांच्या या छंदातून इतरांनीही प्रेरणा घ्यावी यासाठी उमेश जाधव धडपड करत आहेत. उमेश जाधव यांना पोस्टाची तिकीट, जुन्या कलात्मक वस्तू, विविध पुस्तक, जगप्रसिद्ध चित्रकारांनी रेखाटलेली चित्रांवरची अनेक पुस्तक या सर्व वस्तू जमा करण्याचा छंद त्यांनी ५० वर्षाहून अधिक काळ जपलेला आहे. आतापर्यंत त्यांच्या संग्रही तब्बल चार लाखाहून अधिक पोस्टेज स्टॅम्प्स आहेत.

मुंबई उपनगरातील कांदिवली पूर्व भागात उमेश जाधव राहतात. त्यांच्या घरात पाऊल टाकताच समोरील दृश्य बघून संमोहित व्हायला होत. सर्वत्र पुस्तकांचा ढिगारा, विविध कलात्मक वस्तूंचा संग्रह. मुख्य दरवाजापासून ते आतल्या खोलीपर्यंत सगळीकडे हेच दृश्य पाहायला मिळत. घराच्या प्रत्येक खोलीत अक्षरशः सावकाश पाय टाकत चालावं लागत. विविध पिक्चर, पोस्टकार्ड, देश विदेशातील सुमारे ८० हजार पेक्षा जास्त पोस्ट कार्ड उमेश जाधव यांच्या संग्रही आहेत. विशेष म्हणजे अनेक लेखकांची महत्वाची पुस्तक, कलात्मक मूर्ती, आकर्षक आकारातील अत्तराच्या बाटल्यांसह अनेक शहर, देवस्थान यांचे कृष्णधवल फोटो, फाऊंटन पेन, मनगटी घड्याळ, जुन्या पेंटिंग्स फ्रेम्स, सिनेमा बुकलेट्स, भगवान गौतम बुद्धांच्या १५० हून अधिक मूर्ती, अशा विविध दर्जेदार वस्तूंचा संग्रह उमेश यांच्याकडे आहे. जगप्रसिद्ध चित्रकारांनी काढलेल्या चित्रांवरची विविध पुस्तक त्यामध्ये रवी वर्मा, रेनेर, एम एफ हुसेन, अमृता शेरगील, पिकासो यांच्या पुस्तकांचा समावेश आहे. तंब्बल ८ हजार पेक्षा जास्त पुस्तकांचा संग्रह त्यांच्याकडे आहे. ६५ वर्षीय उमेश जाधव यांना वयाच्या १५ व्या वर्षांपासून पोस्टेज स्टॅम्प जमा करायची सवय लागली. सुरवातीला उमेश यांचे वर्गमित्र त्यांच्याकडे पोस्टेज स्टॅम्प मागायचे. उमेश यांचे मित्र, नातेवाईक त्यांना आपल्याकडील असलेले स्टॅम्प संग्रहासाठी द्यायचे. अगदी सुरवातीला त्यांच्या एका मित्राने त्यांना स्विझर्लंडचा स्टॅम्प दिला आणि उमेश यांना तो आकर्षक स्टॅम्प पाहून संग्रह करण्याची सवयच जडली. उमेश यांच्या आवडीचा विषय भूगोल असल्याने त्यांनी नकाशाच कलेक्शन सुरु केलं. याबाबत त्यांनी ५०० ते ८०० स्टॅम्प्स जमा केले. नंतर या स्टॅम्पचे मुंबईतील नेहरू सायन्स सेंटरमध्ये त्यांनी प्रदर्शन देखील भरवलं. या प्रदर्शनाकरिता त्यांना ब्रॉन्झ पदक देखील मिळाल. त्यानंतर त्यांचा प्रवास आतापर्यंत अखंडपणे सुरु आहे. संपूर्ण देशभरात त्यांनी अशा प्रकारे अनेक प्रदर्शन भरवली आहेत. आतापर्यंत त्यांना १ सुवर्ण, १ रजत आणि ७ ब्रॉन्झ पदक मिळाली आहेत. उमेश याना पिक्चर पोस्टरकार्ड चा देखील छंद आहे. मार्केट, चोर बाजार तसेच डिलक्सच्या मागे लागून त्यांनी १०० वर्षापूर्वीचे चित्रपटांचे जुने पोस्टर्स देखील मिळवलेले आहेत. एकूणच उमेश यांचा विविधरंगी छंदाचा संग्रह एक हेरिटेज असून, तो पुढे जतन झाल्यास त्याचा युवा पिढीला नक्कीच उपयोग होणार आहे.

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

अवकाळी पाऊस आणि गारपीट या नैसर्गिक आपत्तीवर उपाय काय?

माझं मत

रमेश जाधव (शेतकरी)

'रोजच मढ त्याला कोण रड' अशा अर्थाची एक म्हण आपल्याकडे प्रचलित आहे. अलीकडच्या दोन दशकांच्या काळात ऐन उन्हाळ्यात किंवा डिसेंबर जानेवारीत अकस्मात अवकाळी पाऊस कोसळणे आणि जोरात गारपीट होणे हे आता नियम बनलेले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मात्र प्रचंड नुकसान होते. केवळ सरकारी आर्थिक मदतीपेक्षा अशा अनैसर्गिक आपत्तीवर कायम स्वरूपी तोडगा काढायला हवा.

नाथराव कराड (शेतकरी)

अवकाळी पाऊस आणि प्रचंड स्वरूपातील गारपिटीमुळे मराठवाड्यात मागील काही दिवसापासून सुमारे ७७६ हेक्टर क्षेत्रावरील फळबागांचे नुकसान झालेले आहे. आंब्याचा ऐन बहार आलेला असताना अवकाळी पावसाच्या फटक्याने आंबा उत्पादकांच मोठं आर्थिक नुकसान झालेलं आहे. शिवाय २००० पेक्षा अधिक हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं देखील नुकसान झालं आहे. हवामान शास्त्र विभागाने अशा प्रकारच्या आपत्तीचा अंदाज आठवडाभर अगोदर देण्याचं तंत्र जर शोधलं तर नक्कीच हे आर्थिक नुकसान टाळता येईल.

वैशाली माने (बागायतदार)

शेतातील पीक ऐन बहरात आलेली असतानाच हल्ली अवकाळी पाऊस अचानक कोसळतो मोठ्या प्रमाणात गारपीट होते आणि शेतकऱ्याला अक्षरश उद्ध्वस्त करतो. त्यानंतर सरकारी पंचनामे होतात आणि तुटपुंजा स्वरूपात आर्थिक मदत मिळते. परंतु शेती शास्त्रज्ञांनी शेतातील तयार पीक अशा नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी आधुनिक पद्धतीचे आच्छादन तंत्र वापरून शेतकऱ्यांच्या या समस्येवर कायम स्वरूपी तोडगा काढला पाहिजे.

सुनील कांबळे (शास्त्रज्ञ हवामान खाते)

आपलं हवामान खात आणि वेधशाळा या आता अत्यंत प्रगत अशा तंत्रज्ञावर आधारलेल्या आहेत. हे तंत्र इतकं प्रगत आहे की ठराविक क्षेत्रात अवकाळी पाऊस किंवा गारपीट होणार असेल तर शेतकऱ्यांना तसा अचूक अंदाज मोबाईल, टीव्ही, रेडिओ सारख्या माध्यमातून अगदी आठवडाभर अगोदर दिला जातो. शेतकऱ्यांनी हा अंदाज घेऊनच शेतातील पिकांची काढणी युद्धपातळीवर करावी किंवा पीक वाचवण्यासाठी पॉलिथिनचे आच्छादन करावे.

शब्दखेळ - १५१

खाली दिलेल्या चौकोनात १० सण आणि उत्सवांची नाव लपलेली आहेत. शोधा पाहू.

रा	दि	पा	व	ली	चि	बी	र
म	सं	ग	स	न	न	रं	क्षा
न	क्रा	णे	ळ	व	मे	ग	बं
व	त	शो	शी	रा	को	प	ध
मी	सु	त्स	य	त्री	थिं	च	न
ज	जी	व	जा	ग	बी	मी	सं
य	व	ट	पू	र्णी	मा	दे	हो
अं	द	हि	का	ला	त्र	श	ळी

शब्दखेळ - १५० चे उत्तर

उ	वा	त	इ	लि	फु	लं	आ
द	जो	बॉ	जी	डू	ज्ञ	ला	का
ब	सा	श्री	क्या	भ	भा	रा	पू
त्ती	भा	के	फ	रा	ऊ	ने	र
न	फ	दा	स	ळ	कु	जा	न
धू	ळं	बा	द	डे	कुं	ची	दि
प	ड	टा	ळ	ए	का	कू	वा
चे	रे	मा	ह	प्या	रा	गो	न

एसएचएम शिपकेअर आणि ओएनजीसीकडून; 'विंग्जच-टू-वेव्हजर' परिवर्तनाचा शुभारंभ

तंत्र मंत्र

एसएचएम शिपकेअर या भारतातील जहाजबांधणी, सागरी व ऑफशोअर क्षेत्रामधील अग्रणी कंपनी आणि जगभरात जीवनरक्षक सेवा प्रदान करणाऱ्या प्रख्यागत कंपनीने देशातील महत्त्वाच्या तेल व वायू उद्योगामधील नाविन्यनपूर्ण 'विंग्जव-टू-वेव्हजा' परिवर्तनाचा शुभारंभ केला. कंपनीने अद्वितीय फास्टज क्रू बोट सी स्टॅलियन-१ अभिमानाने लाँच केली. ही ४२-मीटर वेसेल विशेषत: ओएनजीसीसाठी डिझाईन करण्यात आली असून २०२२ च्या डीजीएस ऑर्डर २० चे पालन करते. या क्रू बोटीमध्ये ६० प्रवासांसाठी आसन व्यसवस्था आणि ३ टनांहून अधिक डेक कार्गो क्षमता आहे. अत्यावधुनिक वैशिष्ट्यांसह डायनॅमिक पोझिशनिंग सिस्टाम (डीपी-१), स्टेबिलायझिंग गायरो, मोशन-कम्पेन्सेरटेड गँगवे आणि इंटरसीप्टमर सिस्टाम्स) असलेल्याट या क्रू बोटसह एसएचएम शिपकेअर आणि ओएनजीसी यांच्याटमधील सहयोग सागरी तंत्रज्ञानामधील अग्रणी झेप आहे, ज्यारमधून प्रवासी व क्रू ट्रान्सफरमध्ये अधिक सुरक्षितता व कार्यरत कार्यक्षमतेची खात्री मिळते.

मुंबई पोर्ट ऑथोरिटी, डॉमेस्टिक क्रूझ टर्मिनल येथे सी स्टॉलियन-१ च्या भव्य लाँचप्रसंगी ओएनजीसीच्या टेक्नॉलॉजी अँड फिल्ड सर्व्हिसेसचे संचालक ओ. पी. सिंग, ओएनजीजीच्या प्रॉडक्शचनचे संचालक पंकज कुमार, शिपिंग महासंचालक श्याडम जगन्नांथन (आयएएस), इंडियन रजिस्टगर ऑफ शिपिंगचे व्यावस्थानपकीय संचालक विजय अरोरा आणि

मुंबई पोर्ट ट्रस्ट्चे डेप्युंटी कन्झार्व्हेमटर कॅप्टन भाबतोष चाँद यांच्यावसह ओएनजीसी व मुंबई पोर्ट ऑथोरिटीचे इतर प्रमुख सदस्य उपस्थित होते.

एसएचएम शिपकेअर प्रा. लि. ची क्रांतिकारी सी स्टॅलियन-१ वेसेल ओएनजीसीला आपल्या परिवहन कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढवण्यास सक्षम करेल. ही वेसेल प्रगत सुरक्षितता वैशिष्ट्ये आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षितता संदर्भातील महत्त्वपूर्ण समस्यांचे निराकरण करते, ज्यामधून प्रवाशांना कमी खर्चामध्ये अद्वितीय सुरक्षा मानकांची खात्री मिळते.

जिल्हाधिकारी; खरीप हंगामपूर्व आढावा बैठक

कृषी निविष्टाचा काळाबाजार केल्यास कारवाई

समाचार/नगर-दि.१७

कृषी विभाग, अहमदनगर यांच्या वतीने जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या अध्यक्षतेखाली सन २०२४ खरिप हंगामपूर्व आढावा व नियोजन सभा संपन्न झाली. सभेस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे ,महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (जि. प.) संभाजी लांगोरे, मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गणेश पुरी, प्रकल्प संचालक (आत्मा) गोकुळ वाघ व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

ऑनलाईन प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी, तसेच सर्व प्रांताधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी सभेत सहभागी झाले होते.यावर्षी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लक्षात घेता निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचा अवलंब करत कृषी विभागाने तालुकास्तरावर तहसीलदार यांचे अध्यक्षतेखाली व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खरिप हंगामपूर्व नियोजन बैठकांचे आयोजन केले आहे. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी कृषी विभागाच्या सादरीकरणा दरम्यान खरिप हंगामातील पिकांचे क्षेत्र य उत्पादकता, तसेच आवश्यक कृषी निविष्ठांच्या नियोजनाबाबात सविस्तर सादरीकरण करून मागील वर्षात कृषी विभागाने अंमलबजावणी केलेल्या विविध योजनांची माहिती दिली. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी खरीप हंगामात शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण निविष्टा पुरवठ्यासाठी कृषी विभागाने काटेकोर नियोजनबाबत, तसेच जिल्ह्यात कोठेही कृषी निविष्टाचा काळाबाजार व लिंकिंग आढळल्यास तात्काळ पोलिस केस कोर्ट केस व कडक कायदेशीत कारवाई करणेबाबतच्या सूचना दिल्या.

या खरिप आढावा बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बैंक, व्यवस्थापक मध्यवर्ती सहकारी बैंक, व्यवस्थापक महाबीज, जिल्हा सांखिकी अधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, विमा कंपनीचे प्रतिनिधी, जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, तसेच जिल्हा सिडस फ़र्टीलाईझर पेस्टीसाईड वितरक असोसिएशनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मोदी पंतप्रधान नसते तर राममंदिर झाले नसते- खा. विखे

समाचार/नगर-दि.१७

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात राम मंदिराची उभारणी झाली आहे. मोदींच्या हस्ते रामलल्लांची प्राणप्रतिष्ठा सुद्धा पार पडली. जर मोदी पंतप्रधान नसते तर देशाला राम मंदीराची अजूनही वाट पहावी लागली असती, असे खा. सुजय विखे यांनी स्पष्ट केले.

रामनवमीनिमित्त आयोजित कार्यक्रमात खा. विखे बोलत होते. रामनवमीच्या पार्श्वभुमीवर नगर जिल्ह्यात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वत रामनामाचा जयकार सुरू आहे. खा. सजय विखे यांनी कर्जत तालुक्यातील भांबोरा येथे आयोजित कार्यक्रमात उपस्थित राहून त्यांनी प्रभू रामचंद्राचे दर्शन घेऊन त्यांचे आशिर्वाद घेतले. यावेळी त्यांच्या सोबत आमदार राम शिंदे आणि इतर प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

खा. विखे म्हणाले की, देशात राममंदिरासाठी ५०० वर्षे वाट पहावी लागली. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सरकार सत्तेत आल्यानंतर राममंदिर पुर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला होता. यासाठी न्यायालयातील लढाई सरकारने यशस्वी केली. त्यामुळे अयोध्येत राम मंदिर उभे राहण्याचे स्वप्न पूर्णत्वास गेले आहे. मात्र, विरोधी उमेदवारांकडे सांगण्यासाठी कोणतेही काम नाही. ते त्यांच्या तालुक्याचा विकास करू शकले नाहीत. तर लोकसभा मतदारसंघाचा विकास कसा करणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दहशत आणि दादागिरीचे राजकारण जनता कधीही स्वीकारणार नाही, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. जनतेने विकासाच्या कामावर शिक्कामोर्तब करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करावेत, असे आवाहन त्यांनी केले. खा. विखे पुढे म्हणाले की, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात पाच वर्षात विकासकामे केली आहेत. विकास कामांच्या बळावरच आपण जनतेकडे समर्थन मागत आहोत. बुथवरील प्रत्येक कार्यकर्त्याने मोदींच्या कामांची माहिती मतदारांपर्यंत पोहचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

दिव्यांगी लांडेचे यश प्रेरणादायी - इथापे

समाचार/नगर-दि.१७

आज क्रीडा क्षेत्राचेही जागतिकीकरण झाले आहे, त्यामुळे या क्षेत्रातही करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. जिद्द. चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यात यश मिळविता येऊ शकते. क्रीडा क्षेत्रात मुलींनी सहभागी होऊन, राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारणे ही नगरकरांसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. दिव्यांगी लांडे हीने आपल्या कर्तृत्वाने राष्ट्रीय स्पर्धा गाजवली आहे. तिच्या यशाचे कौतुक करणे आणि तिला प्रोत्साहन देणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. तिच्या या यशाने इतर मुलींनाही प्रेरणा मिळेल, असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष इंजि. सुरेश इथापे यांनी केले.

पटणा (बिहार) येथे झालेल्या ६७ व्या राष्ट्रीय ॲथेलॅटिक्स स्पर्धेत नगरची खेळाडू दिव्यांगी कृष्णा लांडे हीने सिल्व्हर मेडल प्राप्त केल्याबद्दल तिचा जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था व मराठा सेवा संघ यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पतसंस्थेचे उपाध्यक्ष किशोर मरकड, संचालक सतीश इंगळे, प्रा.किसनराव पायमोडे, उदय अनभुले, अच्युत गाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, बबन सुपेकर, रणजित रक्ताटे, प्रशांत बोरुडे, तेजस कासार, कृष्णा लांडे, अतिश रोहोकले आदि उपस्थित होते. सतीश इंगळे यांचे भाषण झाले.

शंभर टक्के मतदानाचा तृतीय पंथीयांचा निर्धार

समाचार/नगर-दि.१७

अहमदनगर महापालिकेच्या वतीने लोकसभा निवडणूक संदर्भात निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी बैठक घेत विविध संघटनांशी चर्चा केली व मतदानाचा टक्का वाढवावा, यासाठी शहरातील तृतीय पंथीयांना १०० टक्के मतदान करण्याचे आवाहन केले, यावेळी काजलगुरु यांनी लोकसभा निवडणूकीसाठी मतदान करणार असे आश्वासन दिले व काजलगुरु आणि त्यांचे सहकारी यांनी १०० टक्के मतदान करण्याची शपथ घेतली .यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंढे,सहायक आयुक्त सपना वासवा, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, प्रसिद्धी प्रमुख शशिकांत नजन, सुनील खलचे, किरण उजागरे व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी आम्ही कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करण्याबाबत सर्वांनी सामूहिक शपथ घेतली.संकल्प कलश उपक्रमाची यावेळी सुरवात करण्यात आली.

शहरात मनपाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवत मतदानासाठी जनजागृती करण्यात येत आहे, मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य असून ते पार पाडण्यासाठी सर्वांनी मतदानाचा हक्क बजवावा आणि लोकशाहीच्या पर्वात सहभागी व्हावे असे आवाहन आयुक्त डॉ. जावळे यांनी केले.

रिपब्लिकन युवा सेना पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्णय

संविधान विरोधी उमेदवाराविरोधात काम करणार

समाचार/नगर-दि.१७

रिपब्लिकन युवा सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे पार पडली. या बैठकीत संविधान विरोधी व जातीयवादी विचाराने कार्य करणाऱ्या पक्षाच्या लोकसभा निवडणुकीतील उमेदवारा विरोधात काम करण्याची भूमिका मांडण्यात आली. तर लोकसभा जिल्हा क्षेत्र अध्यक्षपदी जिल्हा संघटक मेहेर कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली.

रिपब्लिकन युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यावेळी जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

चंद्रकांत जाधव म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत संविधान विरोधी कार्य करणाऱ्या व जातीयवादी विचारसरणीच्या पक्षातील उमेदवारांच्या विरोधात काम केले जाणार आहे. तर शाहू, फुले, आंबेडकर विचारधारेने कार्य करणाऱ्यांचे काम करुन त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मेहेर कांबळे यांनीही मार्गदर्शन केले.

या बैठकीत पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा महासचिव अमोल मकासरे यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करुन त्यांना मार्गदर्शन केले.

रिपब्लिकन युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या :- शहर जिल्हाध्यक्ष- किरण जाधव, प्रसिध्दी प्रमुख दिपक मकासरे. राहुरी तालुकाध्यक्ष- योगेश पवार. नेवासा तालुकाध्यक्ष- गणेश भालेराव, संघटक- सिताराम वायकर, महासचिव- अरबाज शेख, कार्याध्यक्ष- सुंदर रामगुडे

नगर सीए शाखेतर्फे गुंतवणूक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन

समाचार/नगर-दि.१७

– नगर सीए शाखेतर्फे न्यू आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी गुंतवणूक मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. सीए इन्स्टिट्यूटच्या ७५व्या स्थापनदीना निमित्त वर्षभर होत असण्यार्यात कार्याअंतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी सीए नगर शाखेतर्फे सीए पवनकुमार दरक यांनी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गुंतवणूक करताना कुठल्या क्षेत्रात केली पाहिजे , काय काळजी घ्यायची कुठल्या घटकांचा विचार करायचा तसेच गुंतवणुकीसाठी कुठले पर्याय आहेत, दीर्घकालीन गुंतवणूक काशी करायची हे सांगून याचे व्यवस्थापन कसे करायचे, नफा तोटा पत्रक कसे बनवायचे याबद्दल सविस्तर माहिती दिली.

यावेळी नगर शाखेचे अध्यक्ष सनित मुथा तसेच न्यू आर्ट्स कॉलेजचे प्राचार्य बी एच झावरे आणि उपप्राचर्य डॉ. एस बी कळमकर उपस्थित होते. यावेळी प्रा. सीए डॉ. निखिल गोयल यांनी प्रास्ताविक केले. सर्वांचे स्वागत करत प्रास्ताविक आणि शेवटी आभार प्रदर्शन केले.

रामनाम सर्व समस्यांवरील टॉनिक - जावडेकर

समाचार/नगर-दि.१७

भगवंता जवळ जायचे असल्यास नामाशिवाय पर्याय नाही राम नाम हे सर्व समस्या वरील टॉनिक आहे नाम सदा सर्वदा कधी घ्यावे आयुष्याचे सोने होण्याकरता रामनामाशिवाय पर्याय नाही उपासना ही सतत केली पाहिजे, असे प्रतिपादन पुणे येथील ह भ प उद्धव बुवा जावडेकर यांनी कीर्तनाद्वारे केले.

नेप्ती येथील श्रीराम मंदिरात रामनवमीनिमित्त विविध धार्मिक अध्यात्मिक, प्रवचन, कीर्तन, भजन सेवा होत आहे राम नवमी निमित्त आयोजित कार्यक्रमात पुण्याचे ह. भ. प. उद्धव बुवा जावडेकर यांचे कीर्तन झाले. जावडेकर म्हणाले श्रीराम जय राम जय जय राम हा रामनाम नेहमी करावा कोणती संकट येण्याची वाट न पाहता सतत सातत्याने रामनामाचा जप केल्यास जीवनात बदल होईल.

सकाळी काकड आरती तसेच प. पू सप्रे काका यांची काकड आरती चिंतन या विषयावर प्रवचन झाले प पू निलाताई अभ्यंकर यांचे सामुहिक श्रीमद दासबोध पारायण झाले दुपारी लता शिंदे यांची पर्जनेश्वर भजनी मंडळाची भजन सेवा झाली मुंबईच्या संध्याताई घाडगे यांनी गायनसेवा झाली.

महावीर युवक मंडळाच्या सदस्यांनी घेतली सामूहिक शपथ

लोकशाहीच्या उत्सवात मतदानाचे कर्तव्य बजावणार

समाचार/नगर-दि.१७

सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ओळख आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जवळपास ७५ वर्षे लोकशाहीची परंपरा देशाने कायम राखली आहे. गुप्त मतदान पद्धतीने १८ वर्षांवरील नागरिक आपला लोकप्रतिनिधी संसदेत अथवा विधीमंडळात पाठवतात. आताही देशात लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे लोकसभेच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. नगरमध्ये दि. १३ मे रोजी मतदान होणार असून प्रत्येकाने आवर्जून मतदान करून लोकशाहीतील महत्वाचे कर्तव्य बजावले पाहिजे असे प्रतिपादन जय आनंद महावीर युवक मंडळाचे सचिव आनंद मुथा यांनी केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जय आनंद महावीर युवक मंडळाच्या सदस्यांनी मतदान करण्याची सामूहिक शपथ घेतली. यावेळी ज्येष्ठ सदस्य बाबालाल गांधी, ललित बनभेरू, आकाश गांधी, सत्येन मुथा, मनोज गुंदेचा, कुंतीलाल राका, विनोद भंडारी, प्रमोद डागा, हेमंत मुथा, शरद मुथा, योगेश मुनोत, सुरेश गांधी, सचिन कोठारी, अमित गांधी, प्रमोद गांधी उपस्थित होते.

भारतीय लोकशाहीत प्रत्येकाला मतदानाचा समान अधिकार दिला आहे. जास्तीत जास्त पात्र मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. यासाठी प्रशासकीय यंत्रणा राबत असते. लोकांना भयमुक्त वातावरणात मतदान करता यावे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतात. त्यामुळे प्रत्येक मतदाराने लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होऊन आपले मतदान आपल्या पसंतीच्या उमेदवारास केले पाहिजे. यादृष्टीने समाजात व्यापक जनजागृती करण्याचा संकल्पही जय आनंद महावीर युवक महिला सदस्यांनी केला आहे.

निसर्गसंपन्न मामाच्या मळ्यात 'आयकॉन'च्या विद्यार्थ्यांची धमाल

समाचार/नगर-दि.१७

उन्हाळ्याच्या सुटीत मामाच्या गावाला जाऊन धमालमस्ती करणे प्रत्येकालाच आवडते. शेती, निसर्गसंपदा, खुले आकाश, मोकळी हवा, रानमेव्याचा आस्वाद घेताना बच्चे कंपनी रमून जाते. हाच अनुभव आयकॉन पब्लिक स्कूलमधील इयत्ता ३ री ते ५ वीच्या विद्यार्थ्यांनी नगर तालुक्यातील मामाचा मळा या निसर्गसंपन्न रिसॉर्टमध्ये खुल्या वातावरणात घेतला. रात्री चमचमत्या आकाशाखाली तंबू लावण्यापासून अस्सल ग्रामीण जेवणाचा आस्वाद मुलांनी घेतला. रात्री गप्पा गाणी, हास्यविनोद, कलागुणांचे सादरीकरण यात सगळे रममाण झाले होते. नगरमधील ट्रेक कॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्या सहकार्याने या विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

या अनोख्या शिबिराच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात मामाचा मळा येथील जलतरण तलावात डुंबून झाली. परस्पर संवाद, निसर्गाच्या सान्निध्यात मिळणारा आनंद, कुटुंबियापासून दूर मित्र मैत्रिणींसमवेत वास्तव्याचा अनुभव मुलांना मिळाला. मामाची मळा ट्रेक कॅम्पने विद्यार्थ्यांना निसर्गाची एक वेगळी ओळख करून दिली तसेच पर्यावरणाचे महत्वही विशद केले. शिबिराने साहस आणि कुतूहलाची भावना वाढवली.स्वतःबद्दल आणि पर्यावरणाबद्दल जबाबदारीची नवीन जाणीव त्यांच्यात निर्माण झाली. प्राचार्या दीपिका नगरवाला, संचालिका आराधना राणा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाचे विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनीही स्वागत करून शाळेचे आभार मानले.

चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलमध्ये २१ रोजी 'थिंक टँक ज्युनिअर' कार्यक्रम

समाचार/नगर-दि.१७

मनातील भावना व्यक्त करणे, एखाद्या गोष्टीबद्दल आपल्या मनातील विचार चार चौघात धीटपणे सांगणे यामुळे विचारांचे आदानप्रदान होते. अगदी प्री स्कूलमधील विद्यार्थीही त्यांचे निरीक्षण, आकलनातून विचार करतात. अशा सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांसाठी नगरमध्ये प्रथमच रविवार दि. २१ एप्रिल रोजी थिंक टँक ज्युनियर या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे येथील पाठशाला प्री स्कूलच्या नन्हाग्यान फौंडेशनच्या पुढाकाराने नगरमध्ये चित्रकूट इंटरनॅशनल स्कूल या अभिनव उपक्रमाचे यजमानपद भूबवणार आहे, अशी माहिती सीईओ अशोक सचदेव यांनी दिली.

विद्या सर्वार्थ सिद्ध्यै
Chitrakoot
INTERNATIONAL SCHOOL
CBSE Affiliation No. 1130346

थिंक टँक ज्युनियर सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेले एक अद्वितीय व्यासपीठ आहे. मुलांना त्यांच्या संकल्पना मांडण्यासाठी आणि त्यांचे मूर्त वास्तवात रूपांतर करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास आणि कल्पकता वाढवणे हे उद्दिष्ट आहे.

थिंक टँक ज्युनियरचे अबोली रुईकर आणि रोमल सुराना यांनी चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलला या उपक्रमात सहभागी करून घेत यजमानपद दिले आहे. ट्रॉफी पार्टनर म्हणून रोबोटिक सेंटर आणि गिफ्टिंग पार्टनर फन की लँड असणार आहेत. प्रीतीज पाठशाला या उपक्रमासाठी सहयोगी असणार आहे. कार्यक्रमात एकूण ३२ विद्यार्थी सहभागी होणार आहेत. त्यांचे अनोखे दृष्टीकोन आणि नाविन्यपूर्ण कल्पना प्रदर्शित करणार आहेत. फ्लेजलिंग्ज– द आयकॉन पब्लिक स्कूल, सरथ आर्मी प्री प्रायमरी स्कूल, सनबीम्स प्री प्रायमरी स्कूल, चित्रकूट इंटरनॅशनल स्कूल आणि प्रीथिस पाठशालाचे विद्यार्थी यात सहभाग नोंदवणार आहेत.

'व्यक्तिमत्व विकास' विषयावर नगरमध्ये २० पासून कार्यशाळा

समाचार/नगर-दि.१७

व्यक्तिमत्व विकासवर नगरमध्ये २० एप्रिलपासून ४ दिवस कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून, यावेळी मानसोपचार तज्ञ डॉ. श्रीकांत कुलांगे मार्गदर्शन करणार आहेत.

दैनंदिन व्यवहारांमध्ये स्वतःला इतरांच्या तुलनेत सरस ठेवण्यासाठी व्यक्तिमत्व विकासाची गरज आहे. यासाठी श्रीं एज्युकेशन ग्रुप मार्फत ४ दिवसाचा दररोज ८ तास, व्यक्तिमत्व विकास ही कार्यशाळा आयोजित केली आहे या कार्यशाळेत व्यक्तिमत्व विकास टप्प्याटप्प्याने शिकवला जाईल. यामध्ये व्यक्तींच्या विविध व्यक्तिमत्वा संबंधित मानसशास्त्रीय चाचण्या घेऊन प्रत्येकाला त्यांच्यात नेमके कुठले बदल करणे आवश्यक आहे ते सांगण्यात येईल,.

ही कार्यशाळा २०, ते २३ एप्रिल रोजी श्रीम एज्युकेशन ग्रुप, ४५, ओम बेकर्स मागे, किर्लोस्कर कॉलनी, गुलमोहर रोड, सावेडी अहमदनगर या ठिकाणी घेण्यात येईल यासाठी १६ ते ६० हा वयोगट असून यामध्ये विद्यार्थी युवक व महिला सहभागी होऊ शकतात त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नामवंत मानसोपचार तज्ञ डॉ श्रीकांत कुलांगे यांनी केले आहे. कुलांगे स्वतः आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक वर्षांपासून विविध प्रकारच्या कार्यशाळा आयोजित करत आहेत पुणे व नगरमधील अनेक विद्यार्थ्यांना व महिलांना याचा फायदा झाला आहे.

महावीर जयंती दिनी रविवारी आनंदधाम येथे भक्ती संध्या कार्यक्रम

समाचार/नगर-दि.१७

संपूर्ण जगाला अहिंसा व शांतीचा संदेश देणाऱ्या भगवान महावीर स्वामींची जयंती रविवार दि.२१ एप्रिल २०२४ रोजी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त आनंदधामच्या प्रांगणात जैन सोशल फेडरेशनच्या वतीने सायंकाळी सात वाजता भक्ती संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. इंदौर येथील सुप्रसिध्द गायिका सृष्टी जगताप व डॉ.श्रद्धा जगताप ही मायलेकीची जोडी या कार्यक्रमात सुरेल भक्ती गीते, भजने, भावगीते सादर करणार आहे.

डॉ. श्रद्धा जगताप या मागील ३० वर्षांपासून संगीत क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी संगिताचे प्राथमिक शिक्षण इंदौर येथे ग्वाल्हेर घराण्याचे पंडीत सुनील मसूरकर यांच्याकडे घेतले. त्यांनी शास्त्रीय संगीतात एम.ए., एमफील तसेच पीएच.डी. केली असून गंधर्व महाविद्यालयातून त्यांनी विशारद पदवीही प्राप्त केली आहे.

सारेगामा,सरगम,मेरी आवाज़ सुनो,गौरव महाराष्ट्राचा , सुर संगम, ईटीवी उर्दू ग़ज़ल सारा, ईटीवी मराठी , सहयाद्री मराठी या दूरचित्रवाणी वाहिन्यांवर त्यांच्या गाण्यांना अनेक दिग्गज संगीतकारांनी दाद दिली आहे. संगीतकार नौशाद , खैयाम , रविंद्र जैन , सुरेश वाडकर, भूपेंद्र मिताली , चंदनदास, श्रीधर फड़के अशा अनेक दिग्गजांनी त्यांना आशीर्वाद दिले. अनेक कॅसेट कंपनीच्या गीतांना त्यांनी आपले सुरेल सूर दिले आहेत. राजस्थानी, बुंदेलखंडी मराठी, गुजराती, भोजपुरी चित्रपटात त्यांनी गीते गायली आहेत. सूर श्री, कलाश्री, सूरमनी, लता मंगेशकर अलंकरण, इंदौर की सुरीली बेटी, दीवा ऑफ इंदौर, महारथी सन्मान अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना वेळोवेळी गौरविण्यात आले आहे.

सृष्टी जगताप या सुद्धा आईच्या पावलावर पाऊल गायन क्षेत्रात स्वतःचं अस्तित्व निर्माण करत आहेत. सुरेल गायन करतात. मागील वर्षी त्यांनी आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त नगरला भक्ती संध्या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. नगरमधील भक्ती संध्या कार्यक्रम भाविकांसाठी प्रभू भक्तीची पर्वणी ठरणार असून जास्तीत जास्त भाविकांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

विकणे आहे
नागरदेवळे फाटा, हराळे मळा येथील यलो झोनमधील २० गुंठे जमीन विकणे आहे.
-: संपर्क :-
9226310730

विकणे आहे
गुलमोहर रोड येथील रोड टच पहिल्या मजल्यावरील १००० स्क्वे. फुटाची वेलफर्निश्ड ऑफिस स्पेस विकणे आहे.
-: संपर्क :-
9011923939

2 BHK घर/बंगला भाड्याने घेणे आहे
- सेमी फर्निश्ड, पार्किंग आवश्यक
- शहराच्या मध्यस्तीत अथवा जवळ
- तळमजला किंवा लिप्ट आवश्यक
- शाकाहारी जैन कुटुंबासाठी
संपर्क क्रमांक :- 9420750218

कापड दालनासाठी
अनुभवी स्टाफ पाहिजे (महिला व पुरुष)
- सीसीओ - ०४
- मॅनेजर - ०४
- अकौंटंट - ०४
- सेल्समन -२०
- हेल्पर - १०
• समक्ष भेटा • व्यंकटेश ट्रेडलिंक
मिसाळगल्ली, तेलीखुंट, अहमदनगर. मो. 9736551000

दैनंदिन व्यवहारांमध्ये स्वतःला इतरांच्या तुलनेत सरस ठेवण्यासाठी व्यक्तिमत्व विकासाची गरज
श्रीं एज्युकेशन ग्रुपमार्फत आयोजित
व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा
१६ ते ६० हा वयोगट असून यामध्ये विद्यार्थी युवक व महिला सहभागी होऊ शकतात
आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नामवंत मानसोपचार तज्ज्ञ **श्रीकांत कुलांगे**
दि. २० ते २३ एप्रिल रोजी (४ दिवसाचा दररोज ८ तास)
श्रीं एज्युकेशन ग्रुप, ४५, ओम बेकर्समागे, किर्लोस्कर कॉलनी, गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर
शहर व परिसरातील गरजूंनी अवश्य लाभ घ्यावा
अधिक माहिती व प्रवेशासाठी पुढील नंबरवर संपर्क साधावा | 9890 420 209

|| जय श्रीराम ||
श्रीराम नवमीच्या
हार्दिक शुभेच्छा!

मा. श्री. अविनाश देडगांवकर
समाजसेवक
अहमदनगर

Domestic
Heat Pump Water Heater

अखंडित गरम पाण्यासाठीचा सोपा मार्ग
१७ वर्षांपासून ग्राहकांच्या सेवेत
आदित्य एंटरप्राईजेस
गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर
मोबाईल नं. : ९३२५१०३७८१

SASE DCORATERS
Mandap, Light & Flower Decoraters
Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar
9822331006, 9579544110

जावक लिपीक ९९१/२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, २ रा. मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, आकाशवाणीसमोर, सावेडी, अहमदनगर
दि. १५/०४/२०२४

चौकशीची जाहीर नोटीस

चौकशी अर्ज क्र. : ३३२/२०२४
SRN NO. AHM-14932-1860-2023-24
संस्थेचे नाव – जामखेड तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशन – १९८७, ता. जामखेड, जि. अ. नगर
अर्जदार – डॉ. संजय दत्तात्रय राऊत

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, सहाय्यक संस्था निबंधक अहमदनगर हे वर नमूद केलेल्या अर्जासंबंधी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था नोंदणी साठीचे प्रस्तावाबाबत खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? आणि वर नमूद न्यास यापूर्वीच नोंदणीकृत झालेला आहे काय? खालील निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय? अ) जंगम मिळकत वर्णन – ६५१३/– अक्षरी सहा हजार पाचशे तेरा रुपये, ब) स्थावर मिळकत वर्णन – काही नाही. सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देण्याचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल, अशा रितीने पाठवावी अथवा समक्ष हजर रहावे. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक संस्था निबंधक अहमदनगर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १५/०४/२०२४ रोजी दिली.

वरिष्ठ लिपीक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहमदनगर विभाग अहमदनगर

शिक्का

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहमदनगर विभाग अहमदनगर

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक – १२ एप्रिल ते १८ एप्रिल २०२४

बडे मियाँ छोटे मियाँ
8.00 AM
11.15 AM
2.20 PM
4.25 PM
7.45 PM
10.00 PM
10.55 PM

मैदान
8.15 AM
11.45 AM
1.00 PM
3.15 PM
8.45 PM
10.15 PM

स्वातंत्र्यवीर सावरकर
9.30 AM

GODZILLA X KONG
5.30 PM

CREW
7.30 PM

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradise
AVAILABLE ON book my show CONNPLEX AVAILABLE ON book my show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

UNITED PHARMA
Sargical & Generic Medicine
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
UNITED PHARMA
9049934444
7972378081
9822020649

Milk & Cream Icecream Product
Arun® ICECREAMS
HATSUN Daily
Red Velvet
Rocky Road
प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144